
आम्रकुसुमांजली
शुभांगी पासेबंद

# आम्रकुसुमांजली

शुभांगी पासेबंद

ई साहित्य प्रतिष्ठान

# आम्रकुसुमांजली (स्तंभ संग्रह)

लेखिका : शुभांगी पासेबंद

9869004712

scpaseband@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

9869674820

प्रकाशन : १५ सप्टेंबर २०१६

©esahity Pratishthan®2016

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

# स्तंभाचे नाव

- शंभूची कावड
- माहेरचा मोहोर
- नंतर म्हणाल करायचे राहून गेले
- फुलपाखराचे पंख
- नारोशंकरा ची घंटा
- शृंगाराचा अतिरेक
- आता झेपत नाही
- पुन्हा नाही येणे आता
- शेतकरी देवो भव
- आताचा क्षण
- वय निघून गेले
- साभार परत आलेले
- दर्पण दिन
- काय भुललासी वरलिया रंगा
- तांदूळ घ्या तांदूळ
- जाने वो कैसे लोग थे
- पर्याय कुठे होता
- आईच्या अश्रूंचा आवाज
- प्रणाम माझा पहिला मृत्युंजय वीरा
- विकास
- चवथी खोली
- कट्ट्यावरच्या मैत्री
- कुठेही जा, पाटी वाचा
- तू कधी सांजवेळी
- प्यासा
- रानफुलांचे नाते
- झरा आटला
- सास भी बहु भी
- गाव हरवलेली मुलगी
- जिभेचे हाड

अर्पणपत्रिका

ही आम्रकुसुमांजली

मी माझी ज्येष्ठ भगिनी,

**सुमति हंडे देशमुख, जुन्नर,**

हिला अर्पण करते

शुभांगी पासेबंद

५-९-२०१६

# प्रस्तावना

लोकसत्ता,दैनिक ऐक्य,प्रहार,ग्रामोद्धार, मध्ये लेखन करणार्या, सौ शुभांगी पासेबंद यांचे हे चवदावे पुस्तक अाहे. तरिही त्या स्वत:ला,नम्रपणे, या साहित्य क्षेत्रातील विद्यार्थिनी मानतात.

लोककला अॅकॅडमी मुंबई विद्यापीठात त्या ,२०१२ साली, माझ्या विद्यार्थिनी होत्या. यापूर्वी ,त्यांच्या रंगकेशरी या कादंबरीला देखील मी प्रस्तावना लिहिली होती.

दिवसेंदिवस त्यांचे लिखाण अधिकाधिक प्रगल्भ होते आहे.

वाचकांना हा स्तंभसंग्रह नक्की आवडेल.

डॉक्टर प्रकाश खांडगे,

लोककला अॅकॅडमी

मुंबई,११।९।२०१६

# मनोगत

आंब्याच्या झाडाला आलेला तो मोहोर, वातावरण धुंद करून टाकतो. आंब्याच्या मोहोराला आम्रकुसुम म्हणणे रोमांचक व काव्यात्मक वाटते. अशा आंब्याच्या सुगंधी, सृजनक्षम मोहोराची ओंजळ जशी महाशिवरात्रीला शंकराला वाहतात, तशी ती मायबाप प्रेक्षकांच्या चरणी वाहते. शिवाय प्रत्येक आंब्याच्या त्या मोहराच्या छोट्याशा फुलांमध्ये किती मोठी शक्ती असते. त्या छोट्या दाण्यातून पिवळा धम्मक कुयारीच्या आकाराचा, गोड, रसाळ आंबा बनू शकतो. त्याच प्रमाणे माझ्या या छोट्याशा स्तंभातील विचार तुमच्या मनात रुजून सुंदर रसाळ विचारांचे, प्रकल्पांचे रूप धारण करावे ही ईच्छा धरून मी तो लिहते.

मी काही विक्रीची साखळी चालवत नाही. वस्तू विकत नाही. मी विचार देऊ इच्छिते. ते अनमोल असू शकतात किंवा मातीमोल होऊ शकतात.

हो, वादळ वाऱ्याने, अवकाळी पावसाने जर झोडपले तर तो मोहोर गळून जातो व त्या रसाळ फळांची स्वप्ने पूर्ण होत नाहीत. माझ्या एखाद्या स्तंभाचे तसे होऊ ही शकते. पण ते होऊ नये ही ईच्छा!

दरवर्षी नवा मोहोर येतो. नवी पालवी बहरते व आम्रकुसुमांचानवा बहर येतो. म्हणूनच या पुस्तकातील एकाही स्तंभातील विषय या पूर्वी कुठे ही पुन्हा रिपिट झालेला नाही याची खबरदारी मी घेतली आहे.

मायबाप रसिक, परमेश्वर स्वरूप वाचकांना, ही आम्रकुसुमांजली सस्नेह समर्पण! !

मेहेरबान दोस्तो,

एहसान मेरे दिल पे तुम्हारा हैं दोस्तो

ये दिल तुम्हारे प्यार का मारा हैं दोस्तो! !

शुभांगी पासेबंद ५।९।२०१६

# आम्रकुसुमांजली

# १ शंभूची कावड

चैत्र प्रतिपदेपासून म्हणजे गुढी पाडव्या पासून, चैत्र एकादशी, कामदा एकादशी पर्यंत ठाण्यातील श्री शंभूसांकडे, श्री शंकराची, भगवान महादेवांची कावड सजवून, उत्सव करायची पद्धत आहे. चैत्र पाडव्याच्या पूर्वीच, ही कावड स्वच्छ रंगवून, तिच्या ज्या पितळी घंटा व हंड्या आहेत, त्यांना ब्रासो पॉलिश करून कावड तयार ठेवली जाते. कावडीला लाकडी कमान व खांद्यावर धरायच्या, मजबूत काठीला सुंदर रंगाने रंगवले जाते. गुजराथी संखेडा लाकडी कलाकृती प्रमाणे, लाल सोनेरी रंगात ही कावड सजवली जाते. त्या काठीवर उजव्या बाजूला श्री शंकरांची पिंड आहे. काठीवर एकीकडे नंदी आहे.

१९४२ साली, लॉईसबँकेत, नोकरील लागलेले. रामचंद्र संभस सर आता नाहीत. ते ८५ वर्षाचे होते. १५ ऑगस्ट१९४७ ची स्वातंत्र्याची पहाट त्याना आठवत असे. बँकेत कार्यरत असतानाही कुलधर्म, कुळाचार, त्यांनी कधी बुडवले नाहीत. गुरू बरोबर, गुरुनाथ परशुराम दंडवते, त्यांनी बद्रिकेदारनाथाची चालत परिक्रमा, पायात चप्पल न घालता, काट्याकुट्यातून अनवाणी केली होती. प्रतिकूल हवामानातून जाऊन त्यांनी अनेक परिक्रमा केल्या. मात्र त्यावेळी त्यांच्या खांद्यावर, सुमारे साठ किलो वजनाची ही कावड होती. या कवडीकडे बघून, श्रावण बाळाची गोष्ट आठवते. आपल्याला सर्वांना जी माहित आहेच. श्रावण बाळाने कावडीत बसून आई वडिलांना काशी यात्रेलानेले होते. श्रावण बाळाचे आई वडील अंध होते व श्रावण बाळ, पिण्यासाठी पाणी भरायला, तळया जवळ गेला असता, दशरथ राजाच्या बाणाने, तो घायाळ होऊन मृत्युमुखी पडतो. त्यावर तरुण मुलाच्या अकाली मृत्यू मुळे, श्रावण बाळाचे आईवडील दशरथ राजाला शाप देतात कि तुलाही पुत्र शोक होईल व मृत्यू मुखी पडतात.

तकदीर का लिखा हुआ तदबीर क्या करे!

दशरथाने मारला बाण श्रावण क्या करे?

असे म्हणूनच तर म्हणतात. पाण्याच्या तहानलेल्या माणसाला पाण्याची किंमत कळते. आता पाणी टंचाई सुरु झाल्याने आपल्याला ती कळते. कुठल्याशा, पोटाच्या, मजबुरीत, माणसाचे जीवन नेहमीच जात असते. पाण्याच्या आवश्यकतेसाठी, फार पूर्वी पासून, कावडीला डोलीला, एखादा हंडा दोरीने बांधायची, पद्धत असते. संभूसांच्या कावडीत दोन्ही बाजूला दोन तांब्याचे हंडे ठेवायची सोय आहे आणि कावड उचलून यात्रेला फलटण, शिखर शिंगणापूर, अशा, उंच डोंगरावर मंदिरात असलेल्या महादेवाच्या मंदिरात जायची कुलपद्धत आहे. सोलापूर संगमनेर, नांदेड अशा भागात ही पद्धत अजूनही आहे. कावडीवरचे, देवळात त्रिमुखी लिंग असून त्रिंबकेश्वर (नाशिक) प्रमाणे मूर्ती, लिंग, व नाग आहे.

वाटेने, जाता येता अनेक कावडी, भक्तगण खांद्यावर घेऊन यात्रेला जाताना दिसतात.

कुलदैवत म्हणजे भगवान श्री शंकर व कुलदेवता म्हणजे आपल्या मुळगावची देवी होय. खंडोबाला सुद्धा भगवान श्री शंकराचे रूप मानतात. पण संभूसांकडे श्री शंकर कुलदैवत, असा उल्लेख केला जातो. भक्ती भावाने यात्रेकरू जसे पंढरपूरच्या यात्रेला, ज्याप्रमाणे डोक्यावर तुळस वाहून नेतात, तशी ही कावड असू शकते. ज्याच्या त्याच्या कुलाच्या रितीरिवाजा प्रमाणे कावड घेऊन देवदर्शनला यात्रेला जाण्याची पद्धत आहे. प्रवासात पाण्याची सोय व्हावी म्हणून कावडीत हंड्यात पाणी भरून पुढचा मुक्काम गाठायचा असतो. वाटेत कुठेतरी झाडाखाली कावड ठेऊन दगडांची चूल मांडून स्वहस्ते शिजवलेल अन्न खाऊन निजायचे वदुसऱ्या सकाळी पुन्हा तीर्थ यात्रेला प्रवास सुरु होतो.

साधारण १९२० च्या पूर्वीच्या काळात, अशाकावडी जेव्हा जंगलातून जात तेव्हा लुटमारी करणारे लुटारू कवडीवर व भक्तांवर हल्ला करून लुटमार करीत. अशासंकटातून सावरून पुढे नेण्यास श्री शंकर समर्थ असे. तरीही या कावडीत दांडीच्या

समोर एक धारदार बरची, त्रिकोणी टोकाचा तलवारी सारखा चोप असतो. एक मजबूतपण न दिसणारा भाला सुद्धा आहे. ही कावड वनातून जाताना, शत्रूपासून स्वसंरक्षणाची केलेली व्यवस्था शत्रूला दिसू नये म्हणून या ढाल व तलवारी वर फुले, कापडी झेंडे, पताका व रंगीत निशाने लावून ध्वज, उभारून ही शस्त्रे लपवली जात. ह्या पताका सुद्धा खूप सुंदर व सोनेरी जरीच्या आहेत. कथेकरी गुरुजी पायात जे चाळ बांधतात, तो जड पितळीचा चाळा सुद्धा त्यांच्या पालखीवर अडकवलेले आहेत. आता आतील मणी निखळल्याने ते चाऴ वाजत नाहीत पण दिसतात मात्र सुंदर.

श्री संभूसांचे वडील, विश्वनाथ संभूस हे हरीभक्त परायण होते व मंदिरामध्ये त्यांचे सुंदर प्रवचन होई. ते गावी, श्रीमद्भागवत कथा ऐकवीत. गावातील मंडळी मंदिरात जमत असत. एके दिवशी मृत्यु बद्दल सुंदर विवेचन त्यांनी मंदिरात केले. घरी आले व सर्व मुलांना व नातेवाईकांना सांगितले " मी अवघ्या दोन तासांचा सोबती आहे. " सर्वांची भेट घेऊन त्यांनी देह ठेवला, तेव्हा नातेवाईकां बरोबर अवघा गाव अश्रू ढाळत होता, श्री संभूस बँकेत कामाला होते. बदलत्या काळासोबत, आपल्या गुरु सोबतही, त्यांची रजा मंजुर होणे याला यात्रेला कधीही अडचण आली नाही. एकदा वडिलांचे मृत्यूचे तेरा दिवस सुतक पाळण्यासाठी सुट्टी मागितल्यावर गोरा साहेब म्हणाला, "आमच्याकडे अशी मृत्यू नंतर, श्राद्धाची पद्धत नसते आणि कामे करणे हाच देव, तुम्ही वाटल्यास राजीनामा द्या. " तेव्हा "पितृ कर्तव्य श्रेष्ठ" हे जाणून संभूस राजीनामा देऊन गावाकडे निघाले.

कावडी समोर म्हंटली जाणारी गाणी, आरत्या, भक्तिगीते सुद्धा विशेष आहेत. तत्कालीन लोक संस्कृतीचा ती गाणी आरसाच आहेत. चैत्री एकादशीच्या दिवशी, कावडी समोर पूजा अर्चा व सवाष्ण ब्राह्मण पूजा, अशी रीत पूर्वापार आहे. खास कडकण्या, सांजोऱ्यांचा नैवेद्य दाखवला जातो. श्रद्धा भक्तीने घरातील वातावरण भरून जाते.

मी भेटले तेव़्हा, १९४२ ची चलेजावची चळवळ श्री संभूसाना आठवत असे.

देशभक्ती शब्दाशी असलेले माणसाचे नाते श्रेष्ठ असते. कॉंग्रेसच्या काळातील काही स्वातंत्र्य लढ्यातील सर्वोकृष्ट दिवस त्यांना आठवतात. संघ परिवार, त्यांचे जेष्ठ कार्यकर्ते व त्यांच्या काही आठवणी श्री संभूस अजून सांगतात. त्यावेळी, ८५ वर्षाच्या असलेल्या संभूसांनी त्या वयातील त्या काळातील त्यांनी अनेक पक्ष बदललेले पाहिले. अनेक मोठे व महत्वाचे सामाजिक बदल देखील त्यांनी बघितले. दुसऱ्या जागतिक युद्धाची मात्र पुसटशीच आठवण आहे असे ते सांगत होते. युद्ध भूमीवर धारातीर्थी पडलेल्या सैनिकांच्या बातम्या, १९६२ साली भारत चीन युद्धाच्या वेळी त्यांना भारतीय नागरिक म्हणून अस्वस्थ करीत असत. त्यावेळी ते या कावडी जवळ बसून, सर्वांच्या रक्षणासाठी प्रार्थना करीत. आता बदलत्या काळानुसार कावड नाचवली जात नाही. कावड घेऊन देव दर्शनाला निघालेले थोडेफार जे भक्त व जी काही घराणी, शिल्लक आहेत त्यात हे संभूस कुटुंब आहे. ही पालखी सहा फुट लांब तीन फुट रुंद असून २७ वेगवेगळया भागांची बनलेली असून ते जोडून सजवून पुजेस ठेवली जाते. चैत्र प्रतिपदे पासून रोज अखंड तेलवात असते, रोज पूजा आरती नैवेद्य असतो व एकादशीला खास अशा आरत्या व गाणी म्हणून पालखीचे भाग पुन्हा वेगळे केले जातात. तिच्या विविध भागांचे तुकडे, वेगवेगळया पिशव्यात ठेवले जातात. गौरी गणपतीचे जसे, विसर्जन झाल्यावर गौरीचे मुखवटे व पुन्हा मलमली वस्त्रात, डब्यात ठेवतात तशी ही पालखी मग तुकडे करून, उर्वरित काळ आपल्या त्या लाकडी संदुकीत राहते. देहाची कावड ह्या ग्रामीण शब्दाचा उगम, या कवडींच्या रचनेत असेल का?

या काळात कावडीचे पावित्र्य पाळले जाते, पीजा नसतांना मात्र जप होतो. संभूसांची कावडीच्या नुसत्या दर्शनाने अंगावर रोमांच उभे राहतात. स्वतःच्या शारीरिक प्रश्नांनी व दुर्बलतेने जरी आपण तीर्थयात्रा करू शकत नसलो तरी अनेक ठिकाणी यात्रा करून आलेल्या या कावडीच्या दर्शनानेच आपण पावन होतो,

कालप्रवाहात वाहून गेलेल्या दिवसांचा दुवा, असाच चिरंतन जपावा.

देहाच्या कावडीत भक्ती भावाचा ठेवा, हा कावडीचा भक्तांना सांगावा,

श्रद्धेने हात जोडून आशीर्वाद घ्यावा. युगायुगांच्या इतिहासाचा हा दुवा

# २ माहेरचा मोहोर.

शुभ शकुनी माहेरचे कावळे अंगणात आले. माहेर या कल्पनेने स्त्री मोहोरते. अंगणात ओरडणारा कावळा काहीतरी शकुन सांगतो कि पाहुणे येणार आहेत व त्या शुभशकुनाने गृहिणी मोहरून जाते. तो कावळा तिला माहेरचा दूत वाटतो. मग ती त्या कावळ्याला दहीभात दाखवते. अशा कवी कल्पना लोक साहित्यात आढळतात. सासुरवाशीण स्त्रिया माहेरचा सांगावा, तिथून बोलावणारा दूत या कल्पनेत नेहमीच रमतात. सासरी वास्तवांच्या चटक्या पासून वाचवणारे, सद्यस्थितीत असलेल्या असहाय्य परिस्थितीत स्त्रीला ते मलम, ती अफूची गोळी उपयोगी पडते. प्रत्यक्षात मात्र ते माहेरचे स्वप्न, तो आधार खरा असतो का?

सासरी उभ्याने जा व आडव्यानेचत्या घरातून बाहेर पड, असे सांगणारे ते माहेर, मनाला मोहोर आणावे एवढे सुप्रिय, सुयोग़य, असते का? मुलीला माहेरी तरी "खूप हवीशी" लाडकी असे लेबल असते का? एकुलती एक मुलगी असली तर ठीक, पण बहिण भाऊ अशी जोडी असली तर? भाऊ हवासा व बहिण नकोशीच वाटते अशी परिस्थिती असू शकते. चार दिवस मुलीला माहेरी आणायचे तरी, घरी कधी भावाला, काही घरी काही वडिलांना जीवावर येते. बालपणापासून ज्या घरी किमान वीस वर्षे मुलगी वावरली ते घर तिला संकटकाळी चार दिवस आधार द्यायला तयार नसावे?

सिंधुताई सपकाळ (माई )यांची गोष्ट त्यांचे आत्मचरित्र आपण वाखाणतो. मात्र त्या माईला आधार द्यायला जो पती, जो भाऊ, जे वडील असमर्थ ठरले त्यांना जाब विचारायला उस्फुर्तपणे उत्सुक होत नाही. देवी इमेज म्हणून स्त्रीने सोसलेच पाहिजे का? सतीची समाधी दाखवून नेहमी स्त्रीने सती जावे, जगण्याचा हक्क सोडावे अशी भावना

स्त्रीवर का लादली जाते? स्त्रीला असमान वागणूक देण्याचे, ते स्लो पॉयझनिंग माहेरपासूनच सुरु होते.

मुलींना चार दिवस माहेरी आणले तरी त्या छोट्या वास्तव्यात "आनंदी आनंद गडे" चा मुखवटा स्त्रीला माहेरी आल्या क्षणा पासून चढवावा लागतो. घटस्फोट, माहेरी परत येणे खूप दुखःद असते. कुठल्याही स्त्रीला ते नकोसेच असते. दुधाचे पातेले, खूप चटका, सहन होईना झाल्यावरच हातातून खाली गळून पडते. स्त्री संसार असह्य क्षणीच सोडते किंवा तसे ठरवते. सिंधूताई सपकाळ यांच्या आत्मचरित्रातून समाज काय शिकतो?

" जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा" असे गीत आळवत मुलीच्या जबाबदारीतून सुटलो म्हणत रोज वर्तमान पत्रातील बलात्काराच्या बातम्यांनी हैराण आई वडील सुस्कारा सोडतात. गळ्यातील चार मण्यांच्या आड ती काय दु:ख घेऊन वावरते, किती कष्ट करते, सासरी तिला कशी वागणूक मिळते याचा विचार करीत नाहीत. मुलाच्या लग्नातील अडसर निघाला, म्हणून मुलाच्या लग्नाचे बेत रंगवू लागतात.

कशीबशी, मुलगी सासरी नांदते! कधी भेटायला आलेल्या माहेरच्या नातेवाईकांत, ती आई वडील सवंगडी शोधते. माहेरचे हे पाहुणे कावळे, काव काव करतात. बडबड करतात. हे लोक शॉपिंग- भटकंती नंतर मुलीच्या हातचे खातात. ती भांडी घासत असताना, हे दात कोरत बसतात. आपली कन्या कष्ट करते हे त्यांना खुपत नाही. हातावर पाणी सोडून " इदं न मम " म्हणून मुलीची जबाबदारी, त्यांनी पार झटकलेली असते. तिची झुंज, ओढाताण, एकाकी अवस्था हे कावळे, कलकल करीत बघतात. फक्त चर्चा करतात. मुलीचा माहेरचा मोहोर त्यावेळी जळून जातो. काही कारणाने सासरचा छळ असह्य होऊन, जर ती कन्या चार दिवस माहेर आली तर? त्यावेळी हे कावळे उडून जातात. तिला एकाकी पाडतात. तिला टोचून मारतात. त्यांना बहिण किंवा कन्या फक्त आपल्या कडील लग्न कार्यात दागिने घालून, मिरवत असलेली हवी असते. तिच्या सुख दु:खाशी व आतल्या दु:खाशी माहेरच्या कावळ्यांना काही देणे घेणे नसते.

शुक्रवारची कहाणी आठवते? बहिण उपाशी आपल्या मुलांना गावजेवणाच्या वेळी जेवायला घेऊन आलेली, त्या श्रीमंत भावाला, नकोशी असते. तो तिला हाताला धरून हाकलून देतो. बहिणीला गरज असते ना! गरजेच्या वेळी उपयोगी पडत नाहीत ती! ना -ती! पुढे श्रीमंती आल्यावर बहिणीला तो जेवायला बोलावतो. बहिण फक्त श्रीमंत व तोंड देखली यावी, तिचे गरजेच्या वेळी तिने येऊ नये, वाटल्यास सासरी मरावे, असे सांगणारे माहेरचे कावळे, हे कायम वास्तव असते.

कुणी हे भोगते, कुणी हे सांगते, कुणी हे लपवते! सिंधूताई सपकाळ, यांच्या कथेतून ते जगाला दिसले. पण धडा कुणी घेतला का? कुठे गळाला माहेरचा मोहोर?



# ५ नारो शंकराची घंटा

नाशिकची नारो शंकराची घंटा ही त्या गावाची खास ओळख आहे. नाशिक (महाराष्ट्र) येथील पंचवटी भागात गोदावरी नदीच्या तीरावर, नारो शंकराचे मंदिर आहे. रामेश्वरच्या धरतीवर बांधलेले हे नारो शंकर मंदिर नारो शंकर राजे बहाद्दूर यांनी १७४७ साली बांधले होते. प्रमुख मंदिर एका उंच चौथऱ्यावर बांधलेले आहे. या मंदिराची सजावट उल्लेखनीय आहे. खालील पहिल्या थरावर कोरीव नक्षी आहे. दुसऱ्या पट्टीवर तोंडात मोत्याच्या माळा धरलेल्या मोरांची मोरावली रांग आहे. या मंदिराच्या बाहेर कोरीव खांब असून मंदिराच्या चारही कोपऱ्यात पद्मासनात बसलेल्या ऋषींच्या मूर्ती आहेत.

वाघ, माकडे व हत्ती यांच्या मूर्ती आहेत. संतांच्यामूर्तींचे हातात पवित्र ग्रंथ व गुलाब आहेत. वृक्ष वल्ली, माणूस प्राणी, पक्षी निसर्ग यांच्या अद्वैताचे व पर्यावरण रक्षणाचा संदेश देणारे हे "नारोशंकर मंदिर" मी १९६३ सालापासून पाहते. गोदावरील नाशिककर गंगा म्हणतात या भागाला सांडवा, दगड असे म्हणतात.

या मंदिरा भोवती अकरा फुट उंच अशी तटबंदी आहे. त्या तटबंदीवर ४ छत्र्या व मेघडंबरी आहेत. त्यातील एक १९६५ सालच्या पुरात वाहून गेली. या तटबंदीच्या मध्यावर नारो शंकरांची घंटा आहे. बाजीराव पेशव्यांचे संबंधी, चिमाजी अप्पा यांनी वसईचा किल्ला जिंकल्यावर, वसईच्या किल्ल्यातील एक घंटा चीमाजी राजेंनी, सरदार राजे बहाद्दूर यांना त्यांच्या युद्ध कौशल्या बद्दल बक्षीस दिली. ती हत्तीवर लादून खूप थाटात ती नाशिकला आणली असे वडील सांगत असत. ६ फुट व्यासाची ही घंटा ब्राँझची बनवलेली आहे. ही घंटा वाजली कि तिचा आवाज ५ मैल पर्यंत पोहोचतो. ह्या घंटेवर १९२१ सालाची नोंद आहे.

भव्य अशी ती घंटा दुरून पहिली तरीही, आपण नाशिक मध्ये राहतो, या पवित्र गंगा गोदावरीचे पाणी पितो व एक उज्वल इतिहास प्रसिद्ध गावाचे नागरिक आहोत, याचा

आनंद होतो. प्रभू श्रीरामाच्या पवित्र स्पर्शाने पावन अशा या पंचवटी परिसरातच, ही नारो शंकरची घंटा आहे. हा दैवयोगच आहे. नाशिकचा राजे बहाद्दूर लेन, राजे बहाद्दराचा वाडा, ही सुद्धा इतिहास दर्शक स्थळेच आहेत.

खूप वर्षापूर्वी पूर आला असताना जेव्हा एक दगडी छत्री वाहून गेली, तेव्हा ही घंटा वाजत होती असे वडील सांगत असत.

आता नाशिक शहर मंदिरांचे शहर उरले नाही. "वाईन कॅपिटल " किंवा "होली पिकनिक", पर्यटन स्थळ अशी नवी ओळख या शहराला मिळाली आहे. आज त्या देवळांचे पावित्र्य, मंदिरांचे वैभव कमी झाले का? नुकतेच १/१/२०११ रोजी रात्री, नववर्षी काही उत्छ्रुन्खल तरुण ही घंटा, जोरजोरात वाजवत होते व त्यावेळी या घंटेचा काही भाग तुटून, खाली पडला. नारो शंकर राजे बहाद्दरांच्या त्या पराक्रमाच्या, उज्वल इतिहासाचा एक दुवा निखळला, दुखः झाले.

अर्धेच टाकुनी डाव जायचे अंती

हेच सांगते ही नारो शंकरची घंटी||

प्रभू रामचंद्रा दे सर्वा तुझी भक्ती||

# ४ आता झेपत नाही

वेळेचे नियोजन कसे करावे आणि त्यात वाढते वय, घटती शक्ती व प्रदूषण या मुळे कंबरडे मोडलेली व्यवस्था, या प्रश्नांनी आपण नेहमीच भांबावून जातो. "पाच मिनिटात येतो" सांगावे तर कुठे तरी, रास्ता रोको नाहीतर, बंद नाहीतर ट्राफिक जाम! मग आपण म्हणतो "आता झेपत नाही" चिडचिड होते ना! या सर्वांवर एक उपाय आहे! "नाही म्हणायला शिका" सकाळ पासून रोबोट सारखे काम करायचे, देह धर्मालाही वेळ नसतो अशी घाई होते. त्यात तू बाहेर जातेच आहेस तर...... येताना आण म्हणून यादी हाती मिळते. दूरदर्शनला चिकटलेल्यांना, पाय मोकळे करण्यासाठी, फिरायला जायचे असते मात्र कामाची यादी आपल्याकडे सोपवायची असते. ट्रेडमिलवर व्यायाम करणाऱ्यांना, पाण्याचा ग्लास हातात हवा असतो. शिवाय थोडासा आत्मविश्वास कमी असलेली व साधी व्यक्ती मग, सोसेना इतके काम डोक्यावर घेते. नाव तर ठेवलीच जातात, पण उगीच कामेही लादली जातात. खूप कामांच्या गडबडीत काय करायचे?

१) कामाची यादी करावी व महत्वाची कामे आधी करावीत.

२) रस्त्याच्या नकाशानुसार कुठले काम आधी व कुठले नंतर ते ठरवावे.

३) दुसऱ्यांनी पाय दुखतात म्हणावे व आपण कंटाळून काम करत कोसळावे हे कधीतरी थांबवायला हवे.

४) सर्वांना खुष करणे शक्य नसते. सापाला दुध पाजले तरीही तो विषच ओकतो.

५) "करणाऱ्याने करत रहावे, बसणाऱ्याने बसून रहावे" ही कार्य संस्कृती असेल, तर छोटी कामे तरी दुसऱ्यावर सोपवावी.

६) मोठी कामे करण्याची क्षमता व बुद्धीमत्ता असणारी व्यक्ती सुद्धा शारीरिक क्षमता कमी पडल्यास मागे पडते. आपल्याला दोन हात आहेत. त्यामुळे मल्टी टास्किंग अवघडच असते. हे जाणावे.

७) पटकन हो म्हणू नका. विचार करते, बघते, ठरवते सांगा. पूर्वीच्या विनंती वरचे काम करायचे बाकी राहिले आहे. नंतर बघू असे म्हणा. सुट्टीची गरज मला आहे. विश्रांती मला हवी आहे हे ठासून सांगा. बस! "आता झेपत नाही " हे स्वतःच ठरवा आणिऊघड सांगायचा प्रयत्न करा.

# ५ शेतकरी देवो भव

शेतकऱ्याचे महत्व, कांद्याने वांदा केल्यावर व महागाई गगनाला भिडल्यावर, सर्वांना आपोआपच कळले आहे. केबल टीव्ही शिवाय, मोबाईल इंटरनेट शिवाय, जगणे शक्य आहे. मात्र पोटात अन्न नसेल तर उपाशी पोटी, काहीही करणे शक्य नसते. भ्रामक खोट्या प्रतिमांनी पोट भरत नसते. (virtual)

माणूस जगतो कशासाठी?

या टीचभर पोटासाठी.

अन्नाचे महत्व हे असे असते. तो अन्न दाता शेतकरी हा आपला मायबाप, अधिदाता असतो. खरेतर हा शेतकरी "शेतकरी राजा" हवा. तो आपल्या शेतात, सर्व प्रकारे कष्ट करतो राबतो. पावसावर अवलंबून असलेल्या शेतीत, काबाड कष्ट करतो. मात्र आपला अर्थ संकल्प, आपली अर्थ व्यवस्था यात शेतकऱ्याची गरज त्याचे महत्व आवश्यक तेवढ्या प्रमाणात अधोरेखित होते का, ह्याबद्दल प्रश्न पडतोच.

१९९२ सालापासून जागतिकीकरण खाजगीकरण व मुक्त अर्थव्यवस्था(Liberalization, Privatization, Globalization ) भारत देशात आले. या LPG चा स्फोट होण्याची वेळ सध्या आली आहे. ग्रामीण विकास व शेती ह्या मुख्य गोष्टींमध्ये प्रगती झाली तर विकासाचा दर अधिक वाढू शकतो व तो अधिक वास्तव ठरेल. म्हणजे फक्त काही मूठभरांची प्रगती२० % व ग्रामीण गरीब जनतेची प्रगती ५% याची सरासरी म्हणजे १२. ५% अशी व्हावी. ही अपेक्षा आहे. स्टोक मार्केटच्या प्रगती एवढीच, ग्रामीण विभागीय लोकांची व दारिद्र्य रेषे खालील लोकांची प्रगती आवश्यक आहे. ते या

भारत देशाचे नागरिक आहेत. सध्या शेती क्षेत्रातील विकास दर ४% च्या आसपास आहे. वाढत्या लोकसंख्येचा भस्मासुर अन्नाचे उत्पादन खाऊन टाकतो व अन्न धन्य टंचाई वाढत जाते. शेतकरी हा हवामानातील बदलामुळे हैराण झाला आहे. शेती न पिकणे व पिकांची नासाडी हे दोन मोठे प्रश्न, या भारत देशा समोर उभे आहेत. हे प्रश्न त्या शेतकऱ्यांचे आहेत, असे समजणे चूक आहे. ते आपले सर्वांचे प्रश्न आहेत.

जमिनीचा कस कमी होणे. अवकाळी पाऊस, वणवे, कीड, दैव निर्भरता या शेतीतील समस्या, लवकरात लवकर, कमी व्हाव्यात. अर्थ संकल्पात शेतकऱ्यांना मोठी मदत मिळावी. शेती आधुनिक व्हावी. व शेतीतील विकासाचा दर वाढावा हिच अपेक्षा आहे. शेतकरी राजा हा अन्नदाता आहे. आपण सर्वानीच "जय जवान जय किसान" म्हणायला हवे.

"शेतकरी देवो भव"

# ६ वय निघून गेले

(गावठी गोड गाठी)

गावठी गोड गाठी हा आमचा बालपणीचा खास खाऊ होता. हल्ली मी रोज ऑफिसला जाताना, त्या हातगाडीवर, पांढर्‍या पेठ्याच्या, ढिगा शेजारी लाल रंगाच्या त्या गोड गाठी, रचून ठेवलेला, तो विक्रेता फेरीवाला दिसला, कि मी अवस्थ होते. जिभेला काय करावे सुचत नाही. आपोआप तोंडाला पाणी सुटते. रोज वाटेत गाडी थांबवून त्या गोड गाठी खाव्यात पण आपल्या हुद्द्याला ते शोभत नाही कुणी ओळखीच्या व्यक्तीने पाहिले तर हसतील असे वाटते व मी मन मारून पुढे जाते.

तिथून, गाडी पुढे गेल्यावर, वळणावरून, मागच्या काचेतून, मी त्या लाल गावठी गोड गाठीचे हातगाडीकडे बघत राहते. कुणी एखादा शाळकरी मुलगा आईचा हात हात धरून, त्या गाडीपाशी येतो व जुन्याशा वर्तमानपत्राच्या कागदात, तो फेरीवाला, ती लाल गाठी बांधून देतो. त्या बालपणीच्या भोळया भाबड्या आठवणी मी, त्या लहान मुलाच्या आनंदाने उजळलेल्या चेहऱ्यात शोधत राहते. मी स्मरण रंजनात रमते व डोळयातून घळ घळ पाणी वाहते. पाखरांचे पंख कापून त्याचे उडणर का थांबवावे? बालपण अचानक का संपावे? १९६३ च्या दरम्यान जेव्हा नाशिकला त्या गावा बाहेरच्या बंगल्यात राहायला गेलोतेव्हा काहीही खरेदी करायची असेल तर, अशोक स्तंभावर नाहीतर गोदावरी नदीच्या तीरावर म्हणजे गंगेवर यावे लागत असे. खूप किरकोळ खरेदी करून, पिशव्या भरल्या कि, पाय ओढत घरी जायची वेळ येई. रस्त्यावर मिणमिणते दिवे असत. त्या काळी रिक्षा बस स्कूटर अशी वाहने नव्हती. नाशिक त्यावेळी खेड्याहून खेडे होते. आम्ही सर्व बहिणी सायकलवर एक दोन किमी दूर शाळेत जात असू. घरी पोहोचणे यास नदीवरून चालत दीडतास लागत असे. थंडी खूप असे व भूक लागून जाई.

त्यावेळी अशोक स्तंभांजवळ, "लल्लूभाई पटेल" नावाचे किराणा दुकान होते. त्याच्यासमोर, एका झोपडीवजा हॉटेलात, काचेच्या बरणीत, लाल गोड गाठी मिळत असत. जुनाकाऴ होता तो, गल्लोगल्ली वडापाव मिळायचे व चांगल्या लोकांनी हॉटेलात खाण्याचे ते दिवस नव्हते. त्या गोड गाठींचा खाऊ आम्हाला मिळाला कि आम्ही खूष होत असू व गळणारे नाक पुसत गोड गाठी खात तो दीड तासाचा प्रवास आनंदाने पाय ओढत पुरा करीत असू. खाऊन पिऊन सुखी कुटुंब होते, पण माज नव्हता. ते भाबडे बालपण आठवते. डोळयातील खोल डोहातील निरागस स्वप्न व मागण्या छोट्याशाच होत्या.

त्या गोड गाठी खाण्यातला आनंद अजूनही मनात रेंगाळतो. आता त्या गावी तो बंगला नाही. हात धरून फरफटत जायला, जिचे बोट धरावे ती आई नाही. गोड गाठींचे हॉटेल नाही. मात्र मनाच्या कोपऱ्यात बालपणीच्या आठवणीत, त्या लाल गोड गाठी अजूनही, अगदी घट्ट रुतून बसल्या आहेत. सहनशीलपणे जे मिळाले ते गोड मानून आपण पुढे जातो. इतक्या फाइव स्टार चवीच्या पदार्थाला, रोड साइड, सडक छाप, पदार्थ का म्हटले जाते?

आज तरी, घरी परतताना मी गाडी थांबवून, त्या लाल गोड गाठी घ्यायची हिम्मत करू शकेल का? कि वाढत्या वयाबरोबर वाहत्या काळाबरोबर व व्हाईट कॉलर बिरुदा बरोबर, माझे बालपण हद्दपार झाले आहे? फुगे खरेदीचे जसे वय असते, तसे गोड गाठी खाण्याचे सुद्धा असावे? लाल गोड गाठी तुम्हाला खाव्याश्या वाटतात का? खिडकीच्या काचेतून त्या लाल गोड गाठींकडे बघत मी फक्त सुस्कारा टाकतो.

गोड गाठी खाण्याचे वय निघून गेले.

आईचे बोट धरून फिरण्याचे वय निघून गेले.

आले पिझ्झा आईसक्रीमची दुकाने, मॉलचे मेले

बालपणीच्या सुख स्मरणाचे, वय निघून गेले

आशीर्वाद देणार कापरे हात आता सुटून गेले.

# ७ दर्पण दिन

दर्पण हे पहिले मराठी वृत्तपत्र, बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरु केले. सुरुवातीला हे वृत्तपत्र अर्धे मराठी व अर्धे इंग्रजीत सुरु केले गेले. वर्तमानपत्राचे ध्येय Educate inform हेच होते. त्यापूर्वी फक्त इंग्रजीतच वर्तमानपत्रेप्रकाशित होत व ती त्या त्या विचारांचा पुरस्कार करीत. काही वर्तमानपत्रे ही त्या त्या प्रकाशकाची, संपादकाची मते सांगत असत. उदा. National Herald - जवाहरलाल नेहरू यांचे विचार बऱ्याच अंशी व्यक्त होत.

उदा. हिंदू हे नंतर आलेले वृत्तपत्र लोक जागृती करू लागले. तर त्या वेळच्या देशस्थिती लोकस्थिती बद्दल सांगणे हे, केसरी (लोकमान्य) वृत्तपत्र करू लागले. पुढे विकासाचे व मुद्रण तंत्रज्ञानाची प्रगती यामुळे वर्तमानपत्राचा खप खूप वाढला. आता वृत्तपत्र हे मतपत्र नव्हे. माध्यमातून जे मिळते त्या व्यतिरिक्त अधिक काही वर्तमानपत्र देतात. Infotainment! आता बातमीला झळाळी आहे. व paid news आले. वाचकाला मत देणे, वाचकाचे मत तयार करणे हा हेतू आहे. वर्तमानपत्रांची भूमिका ही संदिग्ध नसावी. आपल्या ध्येयाबाबत स्पष्ट धोरण, वर्तमान पत्रांना हवे.

वर्तमानपत्र हे समाजाचे डोळे असतात. लोकांनी, काय बघायचे हे पत्रकार ठरवतो.

बातम्या, ह्या सुधारणेचे दरवाजे असतात. बातम्यातून विचार व क्रांती घडू शकते.

पत्रकारांवर फार मोठी जबादारी असते असे अरुण शौरी म्हणतात. सत्तेच्या दबावापुढे टिकून न राहू शकणारे, पुढे सत्तेचे दलाल बनू शकतात व अनेक बंधने स्वार्थाने लादली जातात. विश्वासार्हता अबाधित राहील असेच वृत्तपत्रांनी लिहावे. फायदा

देण्यासाठी कायदा मोडून चालत नाही. दबावाला बळी पडून आम्ही कायद्याच्या विरुद्ध जावे का? मग समाज नीतीचे काय? २०२० पर्यंत माध्यम क्षेत्रात सुद्धा प्रगती व्हावी. हा चौथा स्तंभ, पत्रकारिता देश सुधारणेत उपयोगी पडावा. विकास, जबाबदारी, नियम, सत्याचे मिश्रण हवे. तत्वज्ञान +व्यवहार + आचारसंहिता यांच्या जाणीवेने पत्रकार तयार होतो. स्थानिक प्रश्न, स्थानिक पत्रकार जाणतो व पुढे आणतो. नव्या तंत्रज्ञानाच्या बदलत्या युगात सुवर्ण मध्य हवा व माणुसकी सुद्धा टिकून रहावी. जवळ जवळ २५०० वर्तमानपत्रांना स्पर्धेत टिकून राहायचे हवे असेल तर, पर्यावरणाचे प्रश्न, नवे नवे प्रश्न जाणून शरसंधान करायला हवे. खरेतर हुशार व ज्ञानाधारित पत्रकार उद्योग हा प्रगतीशील आहे व अधिक होईल. मात्र विश्वासार्हता सुद्धा जपली गेली पाहिजे. पत्रकार दिन दरवर्षी ६ जानेवारीला साजरा होतो. पत्रकारितेत आधिक माहिती ज्ञान व संशोधन हवे. आज पुरवण्या, ज्ञान, आकर्षक रूप अशी वर्तमानपत्राची नवी आकृती आज आली आहे.

अशीच तिच्यात विचारांची ज्योत देखील हवी.

# ८. तांदूळ घ्या तांदूळ

तांदूळ घ्या तांदूळ, अशी आरोळी ऐकू आली कि त्या आळीतील बायका, मापटी घेऊन अंगणात जमत असत. नाशिकच्या त्या गावा बाहेरच्या तुरळक बंगल्यांमध्ये ही त्या तांदूळ विकणाऱ्या फेरीवाल्या बाईची वाट बघणारे बरेच जण होते.

जवळच्या त्र्यंबकेश्वरच्या अंजनेरी जवळील काही शेतांमधला, तो काळी मुछ जातीचा, तांदूळ घेऊन दुर्गाबाई महिन्यातून एकदाच येत असे. तिच्या जवळ फार तर ५/६ किलोचेच बोचके असे. डालड्याच्या डब्याच्या पत्र्याच्या, डब्याने ती शेरने तो तांदूळ मोजून देत असे. "शिजवून बघा" म्हणून ती थोडासा तिथेच अंगणात चुलीवर शिजवायला सांगत असे. तूप घातल्या सारखा छान भात होत असे. कधी येताना ती एक प्रकारची गवता सारखी पाने आणीत असे. भात शिजताना ती पाने घातली कि बासमती तांदुळाच्या भाता सारखी चव येत असे. सर्वांची खबरबात काढत ती आस्थेने सर्वांची विचारपूस करी. दिवसभर तो तांदूळ विकून तिथेच आंब्याच्या झाडा खाली निजून, जे कोणी, जे काही लोणचे वगेरे देईल, ते घेऊन पैशाचा हिशोब करून ते कनवटीला लावून ती त्र्यंबकेश्वरला रवाना होई. त्या गावात दहीवाला, केळीवाला, भाजीवाला, खर्वसवाली, चीकवाला, चणे शेंगदाणे वाला, बांगडीवाला, सोंगाड्या, पुंगीवाला, असे वेगवेगळे फेरीवाले येत असत. पण तांदूळ वाल्या दुर्गाबाई मला कायम आठवतात.

एकदा तांदूळ विकून परत जाताना त्या आईला सांगू लागल्या. "मी काही फिरती विक्रेती नाही, घरी पैसा पुरत नाही म्हणून मग माहेरून आलेले वाण - वानोळयातले तांदूळ विकून मी जाताना मुलांसाठी घरच्यांसाठी भाजीपाला, दुध, फळे सतरंजी कपडा, जी गरज

असेल, ते नेते. घराचे अंदाज पत्रक सांभाळावे लागते. मला अर्थशास्त्र शिकवणाऱ्या त्या फेरीवाल्या बाईंची मला नेहमी आठवण येते.

हल्ली "तांदूळ घ्या तांदूळ" अशी आरोळी ऐकू येत नाही. काळी मुछ, जीरा साळ, दुधमलाई, मोगरा, आंबेमोहोर, या तांदुळाच्या जाती आहेत, हेच फार थोड्या लोकांना माहित आहे. फेरीवाल्यां बद्दल जिव्हाळाही नसतो.

वातावरण बनवणे य़ात फेरिवालयाचा मोठा वाटा असतो

# ९. पर्याय कुठे होता?

लग्नाचा थाट माट होता. पण कोवळी तरुण नवरी व निबर नवरा, ढालगज सासू! कुणीतरी नातेवाईक सांगत होते. "फसवून चांगल्या चांगल्या, श्रीमंत कमावणाऱ्या मुली पकडून, दलाल शोधून जाळयात अडकवायची, त्यांची पद्धत आहे व त्या पद्धतीत त्यांना यश येते. त्यांच्या घरचा एक अनुभवी वृद्ध दलाल म्हणून मुली गाठून द्यायचे काम करतो. एक वृद्धा रडण्याचे, हळवेपणाचे नाटक करून, मुलीला घरात येऊ देते व हळूहळू तो फास, तिच्या गळया भोवती आवळू लागतो, मुले देखणी असल्याने, मूर्ख मुली फसतात. आईवडिलांनाच मुलगी खपवायची घाई असते. लग्नाच्या बाजारात "दलाल" किंवा मध्यस्थ ही व्यक्ती फार पूर्वी पासून अस्तित्वात आहे. अशाही "मुली" जन्मापासूनच नकोशा असतात. आता तर त्या जन्मापूर्वीच नकोशा झाल्या आहेत. म्हणून तर स्त्री भ्रूण हत्या वाढत आहेत. गरीब घरची, फारसा पैसा देऊ न शकणारी, रंगाने सावळी, रूपाने डावी मुलगी असेल, तर अशा मुलीना हे हेरणारे बिजवर चतुर असतात. कधी कधी उपवर मुलगा कामधंदा काहीच करत नाही, तरीही त्या मुलीला फक्त घरकामासाठी सून म्हणून आणून, सुन्न केले जाते. दोन वेळेच्या जेवणावर, ती मुलगी राबराब राबते. त्यात पोरवाडा ही असतोच. एखाद्याच मुलावर थांबण्या इतकी सुज्ञता नसल्याने, त्या मुलीवर त्या घरी राबत मरत जगण्याचा, एकमेव पर्याय उरतो. वधू शब्दाचा संदर्भ हा असा "वध" या शब्दाशी येतो. अर्थात त्या फसवणुकीतून जरी बंधन बांधले गेले असले, तरीही त्या बंधनातून सुटण्याचा पर्याय, त्या मुलीला कुठे असतो? पहिली मुलगी वारल्यावर, त्याच घरी दुसरी मुलगी तिसरीही देणारे महाभाग आहेत. फसवणूक होऊन सासरहून माहेरी आलेल्या मुलीला आधार मिळणे सुद्धा अवघड असते. सन्मान तर खूपच दूरची गोष्ट आहे. बलात्कारि मदांध, मदिरांधाना हे कोठून कळणार?

मध्यंतरी वर्तमानपत्रात बातमी वाचली कि एका स्त्रीने दोन मुलींसह आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. त्याबद्दल त्या स्त्रीला दोषी मानले गेले. त्या पुरुषाला का दोषी मानत नाही? तीन जणींना आत्महत्येला प्रवृत्त करण्याचा गुन्हा दाखल करून त्या पतिला आधी आत टाका. तो काय स्वतःला साव बुवा समजतो का? तुम्हीच सांगामाहेरी व सासरी कुठेही आधार नसलेल्या, अगतिक तरुण स्त्रीला, समाज सुखाने, सुरक्षितपणे जगू देतो का? तिला आत्महत्येच्या पलीकडे पर्याय कुठे होता? आत्महत्येला प्रवृत्त कुणी केले?

# १०. प्रणाम माझा पहिला मृत्युंजयवीरा

नाशिक जवळच्या एका शेतात, लष्कराचे हवाई दलाचे चिता हेलीकॉप्टर कोसळून, दोन मेजर ठार झाल्याची, बातमी वर्तमानपत्रात वाचली. मृत्यू ही सर्वात दुखःद घटना असते. तरुण वयातील उमदे अधिकारी जे देशाची सेवा करण्याचे ध्येय ठेवून सैन्यदलात येतात, त्यांचे असे मृत्यू म्हणजे देवाने केलेला क्रूर प्रहार आहे. असे अपघात होवू नयेत याची आवश्यक ती खबरदारी घेतली जावी. सैन्य दलात जाण्याची इच्छा असलेल्या तरुणांना, बऱ्याच अवघड परीक्षांतून, पास झाल्यावर, कडक शारीरिक तपासणीतून जावे लागते. त्यानंतरच त्यांची सैन्यदलातील नोकरी सुरु होते.

समाजात, आजूबाजूला परदेशी जाण्यासाठी आतुर असलेले तरुण आपण नेहमीच पाहतो.

"भारत हा कधी कधी माझा देश आहे "

मी NRI परत येणार आहे

असे म्हणणाऱ्या तरुणांना, परकीय देशातील नोकऱ्यांचे वेध लागलेले असताना, पायात बेडी घालून वावरायची वेळ आली, तरीही त्यांना परदेशाचा मोह असतो. अशावेळी देशासाठी प्राण धारातीर्थी गेलेल्या व मृत्यू पावलेल्या सैनिकांची महानता समजावून सांगणे सुद्धा अवघड असते.

"या पैशाच्या बादशाहाला दुनिया करते सलाम" अशा या काळात, होतकरू उमद्या तरुणांनी अधिकाधिक संख्येने सैन्याकडे वळायला हवे, देश रक्षणाच्या कर्तव्यात सहभागी व्हायला हवे. सध्यातरी आपण धारातीर्थी पडलेल्या त्या जवानांसाठी इतकेच म्हणू शकतो कि -

प्रणाम माझा पहिला<br>
मृत्युंजयवीरा<br>
हकनाक हनमंता, असे अनेक वीर या सर्व शुरांना माझा प्रणाम!

# ११. चवथी खोली

चौथा कमरा, नावाची एक संकल्पना उगीचच मनात गुंजन करीत होती. घर कितीही मोठे असू दे. अजून एक खोली हवीच वाटते. "चौथा कमरा" हे शीर्षक लिहून कागद घरभर लोळत होता. घरातल्या बाईला चौथी खोली हवी व ती बाळंतीणीची नसावी" असा एक स्त्री स्वातंत्र्याचा वेगळा विचार स्त्री साहित्यात आहे. एक कोपरा सुद्धा, खरेतर त्या स्त्रीचा स्वतःचा नसतोच. पण उगीच आपले म्हणायचे, घर माझे आहे!

खरेतर हल्ली घर लहान असतात, त्यात सामान खचाखच भरलेले असते. पण त्यामुळे माणसांची खरेदीची हौस तर संपत नाही. घरातील इंचन इंच व कोपरान कोपरा सामानाने भरून जातो अशावेळी वाटते, अजून एक खोली असती तरी? वन रूम किचनवाल्याला वाटते अजून एक खोली हवी. परिस्थिती सुधारून तो अगदी पाच खोल्यांच्या घरात गेला तरी त्याला वाटते. सर्वोत्तम जागा दुसऱ्यानेच बळकावली आहे. घर लहान पडतेय. "और एक कमरा चाहिये"

सुरुवातीला प्रशस्त वाटणारे घर सुद्धा या चौथा कमऱ्याची वाट पाहू लागतो. चौथ्या खोलीची अपेक्षा स्त्रीला नाही का? पण निवडीचे स्वातंत्र्यच नाही. हवी ती खोली मुले पटकावतात. नवऱ्याची झोपमोड होते म्हणून खुडबुड करून लिहायचे, स्वातंत्र्य नसते. सासू - सासऱ्यांचे टीव्ही रात्रीही चालूच असतात. आवाजाचे बॉम्ब अंगावर कोसळतात. लेखिकेला वाटते, अगदी स्पष्ट शब्दात लिहिलेले, माझे कर्तृत्व, माझी कलाकुसर, माझी बक्षिसे, माझी हत्यारे, मी त्या खोलीत रचीन, ते नीटसपणे शब्दात उतरवीन. कवयित्रीला वाटते स्त्रीचे आपले विश्व, कधी ब्याक ग्राउंड म्युझिक सारखे, कधी रिंग टोन सारखे माझे

दुःख माझ्या मनात दडून राहतेच. पुसट किंवा स्पष्ट पण त्याचे अस्तित्व असतेच. मग मनातले सुचलेले कागद न मिळाल्याने लिहायचे राहिलेले, लिहायला त्या खोलीत, निट जागा व सोय असेल. पेन जागेवर मिळेल. अनेक वर्षाचा, काळाचा, आठवणींचा व वर्तमानाचा नीटस विचार एका जागी बसून व निवांतपणे करता येईल. तो नीरस झाला तरी नीटस होईल. 'र' चा 'ट' होईल. जुना स्वेटर उसवून, एकेक लोकरीचा धागा ओढत, गुंडा करावा किंवा रीळ बनवतात, तसे माणूस करतो. वय उतरते व मग वृद्धत्व आल्यावर, आपल्या आतला तरुण कप्पा, जागवण्याचा प्रयत्न, ती लेखिका करू इच्छिते. डायरीच्या पानांवर खर्चाचा हिशोब लिहायच्या, वयाच्या पुढे स्त्री जाते. वर्तमानपत्रात, लेखक मन रमत नाही पण दुः खी ही नसतो. कन्गोरेच बोथट झालेले असतात. फार आसुसून ओढ वाटत नाही. पर्यटनाला जावेसे वाटते, मात्र शरीर ही उत्सुक रहात नाही. मग चौथा कमरा हवा ही ओढ ही कमी होते का? मी तुम्हाला समजावते कि स्वतःलाच समजावते आहे समजत नाही.

ती ओढ राहतेच! थोडी मोकळीक मिळाली कि त्या रुटीन आयुष्याचे ओझे ती/तो काही क्षण दूर ठेवते. ती बाई कुणी वेगळीच स्त्री बनते, आपल्या जबाबदाऱ्यां पासून काही काळ वेगळी अशी निवड करते. पुरुषांच्या नजरेची जास्ती भीती रहात नाही. थोडी असतेच, पण धीटपणे काही कार्यक्रमांना स्त्री जाते. भिकाऱ्यांच्या दिशेने नाणी भिरकावून द्यावी, तशी काही वाक्ये येतात. "टीव्ही बघावा, बाहेर कशाला जायचे? घरच्या घरीच करमणूक बरी! ती (टीव्ही वृत्ती) घातक असली, तरीही वैचारिक चर्चेला स्त्रियांना घराबाहेर जायची भीतीच वाटते.

एक स्वतंत्र मुलगी आई वडिलांनी लाडात वाढवलेली, मात्र लग्न झाले कि ती ही संसारात पडते व सामान्य सुखांच्या मागे लागते. यथावकाश चौथा कमरा वगैरे शब्द विसरते.

ती काय करते, काहीच नाही?

ती चौकटीतच वावरते

नोकरी केली तरी ती करियर म्हणून नाही!

घरचे पैशासाठी!

स्त्री मन हळवे होते पण...

मनातल्या खूप गोष्टी वेळ नाही, म्हणून राहिल्या.

काही गोष्टी घरची परवानगी नाही, म्हणून. राहिल्या

वय वाढले कि एक आठवणींशी खेळण्याचा छंद जुडतो. जीवन म्हणजे आठवणींची शिदोरी! बाकी त्याच त्या परिघात खाणे, पिणे, जगणे तर प्रत्येकच स्त्री करीतच असते. चेहरा आठवतो नाव आठवत नाही. मग तो चेहरा, ती आठवण, पुन्हा पुन्हा नजरेसमोर येते व चौथ्या खोलीची ओढ लागते. हल्ली मलाही सारखे वाटते.

चौथा कमरा चाहिये

# १२. कुठे ही जा, पाटी वाचा

पुणेरी पाट्या कुठे ही जा भेटतातच.

Go anywhereकुठे ही जा Gone with windगेलात उडत. अशा अर्थाची वाक्ये आपण नेहमीच भावनाभरात वापरतो. मात्र प्राप्त परिस्थितीतून कुठे जाणे किंवा उडत बाहेर निघणे सोपे नसते. ज्या दगडावर ठेच लागून पडलो किंवा पडणे ठरलेले असते तो दगड टाळून कुठेही जाता येत नाही. तशा काही त्रासदायक गोष्टी टोमणे टाळता येत नाहीत. कुजके व लागेलसे जिव्हारी लागणारे बोलायला सुद्धा तशी विक्षिप्त बुद्धीमत्ता लागते. न टाळता येणाऱ्या, करमणूक करून वर चिमटा काढणाऱ्या टोचणाऱ्या अशा या पुणेरी पाट्या कुठे ही जा भेटतातच! लेखी नाही तर तोंडी भेटतात. पुण्यातच कशाला कुठेही भेटतात.

विश्वास असेल तर या अन्यथा कटा

लग्न मुंज, सत्यनारायणाची बोलणी करण्यास १२ ते ४ येऊ नये.

भिक किंवा मदत मागणाऱ्यानि येऊ नये.

पत्ता विचारण्यासाठी बेल वाजवू नये.

फिरते विक्रेते, पुस्तक विकणारे यांनी येऊ नये

आम्ही अगरबत्त्या लावत नाही. (विकायला येऊ नये)

तक्रार करण्याची धमकी देऊ नका

सूडबुद्धीने त्रास देण्यासाठी बेल वाजवू नये.

आपले रक्त खवळवनाऱ्या व स्वतः शांत राहण्यासाठी काही जणांनी अशा पाटी माला लावणे उत्तम! काही व्यक्तींची nuisance value, म्हणजे त्रास देण्याची शक्ती अफाट

असते व अशा व्यक्तीशी बोलून वेळ घालवण्यापेक्षा, पाटी लावणे चांगले असे मला वाटते. या पाट्यामधून विनोद व नांगी मारणेही साधता येते. सकाळी उठून समोरील काकू, “ मला भजनाला जायचे आहे. मोलकरीण आधी आमच्याकडे पाठवा. " सांगायला आल्या. पूर्ण सोसायटीत कुणी ही नोकरी करत नाही, पण सर्वांना मोलकरीण माझीच पळवायची असते व सकाळी सकाळी येउन डिस्टर्ब करायचे असते. त्यासाठी पुढील पाटी बघा,

"उगीच बाजीराव समजू नये"

"सकाळी सकाळी कामाशिवाय गॉसिप साठी येऊ नये. "

कसे तरी एकदाचे स्टेशनवर पोहोचले. बकाल वस्तीत मुलेच मुले सोबत घेऊन, भिकारी बसले होते त्यांच्या साठी -मलावाटले ह्यांना कुटुंबनियोजनाची गरज आहे.

"स्वतःचे पोटाची भ्रांत असताना मुल हवेच का? ”

सर्वत्र अस्वच्छता होती त्यात अनेक विधी उरकणारे ही होते. त्यांचा साठी

"इतरांना घाण वाटते, उघड्यावर बसू नये.

बघणाऱ्याना लाज वाटते इथे बसू नये. "

“कचरा फेकणाऱ्याना "२६ जुलै चा प्रलय विसरलात का? "

पुढे जावे तर उल्लू व रिकामटेकड्यांच्या घोळका, मुलींची चेष्टा करून त्यांना चिडवत होता. त्याच्यासाठी

"तुम्हाला काम नाही. भविष्य नाही, इतरांना आहे"

माझ्या सारख्या मध्यमवयीन स्त्रीलाहि त्याच नजरेने बघणाऱ्यासाठी

"डायन भी सात घर छोडती ही, तू सात औरतों को तो बुरी नजर से मत देख. "

फेरीवाल्यांच्या कलकलाटात गर्दी दाटली होती. त्यांच्यासाठी पाटी लावावी,

"इतरांनाही फुटपाथवर चालण्याचा हक्क आहे"

ऑफिस मध्ये पोहोचले कर्जाची प्रकरणे साचली होती.

"स्वतःच्या पैशाने काहीतरी घ्या, प्रत्येकच कामाला कर्ज? हवेच का? " तक्रारी आल्या होत्या.

"केवळ सूड बुद्धीने व आकसाने तक्रार करू नये. तक्रार कर्त्याला भरपूर वेळ व शक्ती असली तरीही काम करणाऱ्यांना ती नसू शकते. नळाला पाणी यावे म्हणून हंडी तपेली ठेवून बायका उभ्या होत्या, "मुन्नी बदनाम व सिरिअलची चर्चा" त्यांचासाठी

“शिळया सिरिअलची चर्चा करू नये"

“रस्त्यात किंवा बसमध्ये किंवा गाडीत, मोबाईलवर स्वतःपुरते बोला.

इतरांना तुमच्या संभाषणात रस नाही"

आजूबाजूला घाण टाकून तिथेच मोबाईल वर खेळणाऱ्यासाठी

"स्वच्छता हाच देव, झाडू घे मोबाईल ठेव"

गावात दवाखाने वाढण्यापेक्षा स्वच्छता वाढणे आवश्यक आहे. झाडे तोडण्यापेक्षा झाडे जगवणे आवश्यक आहे. पण हे पटवणार कसे? झाडे ऑक्सिजन देतात,

“झाडे तोडल्यास माणसे भविष्यात गुदमरून मरतील. ”

लाच मागणाऱ्यासाठी "लाच देऊ नये, लाथ द्यावी" वारंवार वादग्रस्त इतिहासाची चर्चा करण्यासाठी

“विज्ञानात नवे शोध लावा. इतिहासात नको”

मोनालिसा स्त्री होती कि पुरुष वाद घालणाऱ्यानसाठी -

"मोनालिसा माणूस होती"

देवळांमध्ये गर्दी करून गोंधळ घालणाऱ्यासाठी -

"देव सर्वत्र आहे, "

नदीवर स्नान करताना गोंधळ माजवणाऱ्यासाठी -

"हेच पाणी सर्वत्र नळाला येते. "

शेवटची माझी पाटी-

मी पण पुणेरीच झाले आहे. तरीही - पुढची पाटी माझ्यासाठीच -

"स्वतःचा उपदेश स्वतः पाशीच ठेवावा"

कुठेही जा, पण उपदेश करू नका

" पाटी लावू नका"

अगदी कुठे ही जा!

# १३. प्यासा

'प्यासा 'नावाचा चित्रपट जगातील सर्वोत्कृष्ट चित्रपटांमधील एक, गणला जातो. आयुष्याच्या धावपळीत मी आता दमले. ठराविक वेळी स्टंप उडवायचे ठिकऱ्या खेळताना, रेघेच्या आतच ठिकरी पाडायची. ठराविक वेळी सागरगोटया गोळा करून घरात शिरायचे. आपल्याच घरी आपण परके कि बाहेरच्यांमध्ये आपण अधिक परके? घटाघटा पाणी प्यायचे पण तहान भागतच नाही.

प्रत्येकजण असे सर्व डगरींवर, लढूनही तहानलेले राहते का? यश-अपयश तहानलेल्या व्यक्तीला हुलकावण्या देते कि यशाने हुलकावणी दिलेली व्यक्ती तहानलेली राहते?

अब्रार अल्वी व साहीर लुधियानवीच्या प्यासाच्या गाण्यातले हे कडवे बघा

" जाने वो कैसे लोग थे जिनको प्यार को प्यार मिला....

हमने तो जब कलिया मांगीं काटोंका हर मिला||

खुशियोकी मँझील ढूँढी तो, गम कि राह मिली.

चाहत के नगमे चाहे तो आहें सर्द मिली,

दिलके बोझको दूना कर गया, जो गमख्वार मिला ||

मी माझ्या मुक्कामाच्या शोधात तहानलेलीच पळत पळत आले व दार उघडायची वाट बघू लागले.

ढूँड ढूँड कर थक गई,,,,,,,,, मै प्यासी रह गयी

# १४. झरा आटला

आपण रिक्षाची वाट बघत असतो. दूरवर उजेड दिसतो. रिक्षा थांबावी म्हणून आपण पुढे सरकतो व हात करतो. रिक्षा जवळ येते व आपल्याला ठोकर मारून पुढे निघून जाते. आपण जखमी होतो. माझे साहित्य तसेच असते. मात्र हल्ली तो झरा आटला का? राजसत्ता, समाजजीवन, संघर्ष, याचा आरसा असलेले साहित्य, हल्ली वास्तवदर्शी का वाटत नाही? सामान्यांच्या त्या संमेलनातील रस संपला आहे का? जीवनाच्या लढाईत, वेदनांनी जखमांतून रक्त ठिबकते, तेव्हा ते शब्द बनून येते. जखमी लढतात, समजतात, लिहितात. जखमांच्या माळा घालून जीवनाच्या परिसंवादात, टीकेचे लक्ष होतात. नुसतेच वांझोटे परिसंवाद! हे परिसंवाद प्रश्नांवर उत्तर शोधतात का? वर्णनाचे, चर्चेने जग बदलू शकते. जर हे वर्णन वर्तन बदलू शकले तर? जी भाषा जीवनाची असते तीच बाहेर उफाळून येते. वेळी अवेळी प्रसुतीतून जन्मलेले साहित्य, त्या काळच्या स्त्रियांची दशा-दुर्दशा दाखवीत होते.

टिकाकार हा शत्रू नसावा आणि समीक्षक हा स्तुती गाणारा भाट नसावा. पण आग ओकणारा कठोर नसावा. ज्योतिबा फुलेंचे "शेतकऱ्यांचा आसूड" हे ठाणे जिल्ह्यातून प्रकाशित व्हायचे. ठाण्याच्या बाहेरच्या व महाराष्ट्राच्या सर्वत्र व भिन्न प्रदेशातून आलेल्या प्रश्नांना साहित्य सामावून घेते. सर्व प्रश्न ते आनंददायी मानते. भाकरीच्या लढाईत माणूस गाव बदलतो. स्थलांतर हा मानवाचा स्थायीभाव आहे. शेतकरी व विद्यार्थी आत्महत्या, करीत असताना काळजात वेदना होऊन शब्द उमटतात. कष्टकरी व श्रम करणाऱ्यांना आदर देणे, आधुनिक साहित्यात दिसत नाही.

सर्वच सिग्नल लालच का मिळतात? खूप गतीने धावत्या जगात, साहित्य सुद्धा धावते आहे. भेसळीने इंग्रजी हिंदी शब्द, मराठीत आले आहेत. पानापानावर काही नकोशा गोष्टीही वाचाव्या लागत आहे. सत्यवादी लिहिणे सोपे नसते. दीपस्तंभासारखे

मार्गदर्शनातही, अवघड साहित्य क्षेत्रात, नाव कमावण्यासाठी, फिलगुड लिहावे लागते. वाचकांना, थिल्लर विनोद व चित्रपट मसाला हवा, असा एक गैरसमज साहित्य क्षेत्रात आला आहे. साहित्याने कात टाकायला हवी. मात्र समाजाचा आरसा जर त्यात आहेतर? समाजाने बदलायला हवे

कोणी विचारेल जेव्हा हरली कशी इथे मी?

तेव्हा जरूर सांगा लढले कशी इथे मी!

साहित्य क्षेत्रात पाय रोवून असलेल्या, अशा काही हुषार साहित्यिकांना सलाम!

बाकी वाचनात येणारे साहित्य बघता, " झरा आटला" असेच म्हणावे लागेल.

# १५. गाव हरवलेली मुलगी

सासरी सर्व सुख असतानाही, अकारण एखाद्या तिन्ही सांजेला डोळे भरून येतात व उदास वाटते

वाटते,

"वाटेने माहेराच्या धावत मन जाते"

सर्वच गाणी लोकगीते यात माहेरचे खूपच आकर्षक वर्णन असते त्यामुळे मीही माहेरी निघाले. बायकांचा बहुतेक हाच प्रॉब्लेम असतो त्यांना नीट मार्गदर्शन मिळत नाही. कुठल्या दिशेने जावू नयेत्याच दिशेने मन धावत जाते. माझे माहेर नाशिकला आहे. स्वर्गीय राजे बहाद्दूर यांनी वसईच्या किल्ल्यातून जिंकून आणलेली नरोशंकराची घंटा १/१/२०११ रोजी रात्री काही कंटकानी जोरजोरात वाजवल्याने तुटली हे वाचून, अशीही मी खूप नाराज झाले होते. नक्की काय झाले असावे? त्या मंदिरातील ती प्रसिद्ध घंटा आता कशी आहे, हे बघण्यासाठी मी नाशिकला निघाले.

कधी काळी म्हटले जायचे, "झुकूझुकू अगीन गाडी,

धुरांच्या रेषा हवेत काढी,

पळती झाडे पाहूया

मामाच्या गावाला जाऊ या "

आता तसे नाही, धूर नाही, मामाचा गाव नाही, जुने काहीही नाही. नाशिकला असेही मंदिरांचे शहर म्हणतात. आता दर चार सोसायट्याच्या पुढे एक मंदिर असे प्रमाण वाढले आहे. माणसे दैवाधीन झाली आहेत कि "वाईन कॅपिटल " अशा या ओळखीशी, सामना करण्यासाठी मंदिरांची संख्या वाढवण्याचा पर्याय पुढे आला. नक्की कळत नाही; पण त्या नाशिकचीओढ, चांगल्या वाईट दोन्ही कार्यांसाठी असते. म्हणजे नवस किंवा क्रिया. माझे नाशिक द्राक्षे व रुद्राक्षांचा संगम आहे. नाही गैरसमज करू नका. दिवसा रुद्राक्ष व रात्री

द्राक्षे असे मला म्हणायचे नाही. दर काही वर्षांनी गाजणाऱ्या सिंहस्थ मेळाव्यातील व चवदार रसिल्या द्राक्षांनी प्रसिद्ध असलेल्या नाशिकचे ते अगदी परस्पर विरोधी रूप सुद्धा स्पृहणीयाच आहे.

गाडीतून पळती झाडे पहात जाताना, अगदी कसारा घाट ओलांडला कि मग नाशिकचे वेध लागतात. मुंबईला मळकट दिसणारे बगळे, मग ती पिवळी चोच मिरवत अगदी पांढरे शुभ्र छान रंगाचे पंख पसरत फडफडत, झाडांवरून बाजूच्या दरीत उडी मारताना, दिसू लागले कि मला माझ्या नाशिकच्या काळया मातीचा वास येऊ लागतो. नांदूर माध्यमेश्वरचा तलाव दिसला कि त्या निळया रंगाचे पाणी व निळया रंगाचे आकाश व हिरव्या पाचूची मखमली हिरवळ यातील नक्की कोणता रंग अधिक सुंदर आहे याचा कविमन विचार करत राहते.

नाशिकला गेले कि शिर्डीचे साईबाबा, त्रिंबकेश्वरचे ज्योतिर्लिंग नाशिकचे काळाराम मंदिर, गोरेराम मंदिर, पांडव लेणी, भुजबळ नॉलेजसिटी समोरची जैन लेणी असे भरघोस, सहलीचे प्याकेज डील असते. अर्थात या सर्वावरचे आयसिंग किंवा टोपिंग असते. सोमेश्वरचा धबधबा! या सर्व कमीतकमी भेटी व अधिकाधिक कितीही मंदिरे व कितीही वाईनरिज असे नाशिकचे दर्शन असते. नासिक चिवडा खास चकना मानला जातो

थंड व प्रदूषण मुक्त हवा हे नाशिकचे वैशिष्ठ्य आहे. आता चौपदरी रस्त्यामुळे तर आपण त्या शहराच्या खूपच जवळ आलो आहोत. हिरवीगार झाडी, गारवा व प्रदूषण मुक्त हवा. हे याचे वैशिष्ठ आहे. मात्र आता या शहराचेझपाट्याने व्यापारीकरण झाले आहे. रस्ते कमी व घरे जास्ती! झाडे कमी व होर्डिंग जास्ती! पादचारी कमी व फेरीवाले जास्ती! देवळे कमी हॉटेलस जास्ती! अशी परिस्थिती झाली आहे. प्रगती म्हणजे काय वसूली हक्क बजावणे? कि निसऱ्गाकडून खंडणी वसूल करणे? दुसरी व्यक्ती सुखी झालेली बघणे म्हणजे सुद्धा प्रेमच असते. पण इथे निसर्गावर प्रेम ऊरले नाही.

कौनसी शाखा पे कौनसा फुल खिले. यार ये तो नासिबोके ही फैसले|, तुमको खुश देखकर मै बहुत खुश हुआ, यह आख भर आयी तो क्या हुआ |

ज्या व्यक्तीला ज्यात आनंद वाटतो ते त्याला मिळू दे. मला कुणाच्या पायातील बेडी बनायचे नाही कि पैशाच्या पंखांनी उडू इच्छिणाऱ्या, त्या पक्षांचे पंख छाटायचे नाहीत. देवा मला माझ्या शब्दांचे गरुड पंख पुरेसे मजबूत राहू देत! देवा ते लोक जे वागत आहेत, ते त्यांनाच ते समाजत नाही, त्यांना क्षमा कर. मात्र या शहराचा हिरवामुकुट हिरावून घेऊ नकोस. घराजवळ पोहोचले, कालपर्यंत ओळखीचे वागणारे रस्ते, पायवाटा लहान लहान घरांचे ठोकले घेऊन उभे होते. कुठेही योजना नव्हती. नियोजन नव्हते. विस्कळीत संरचना! कालपर्यंत इतकी जवळची असणारी माणसे इतकी अनोळखी बनू शकतात? कारण त्या नात्यातून फायदा काढणे किंवा स्वार्थ संपलेला असतो.

बदलाने घाबरून, केव्हा पासून मी सैरभैर झाले आहे. मी कुठून आले व कुठे चालले हेच मला समजेनासे झाले आहे! सर्व झाडे जमीनदोस्त झाली होती. माळी झाड जागवतो पण इथे वरचे मालकच झाडांची काळजी घेत नव्हते. त्यामुळे सर्वत्र घरेच घरे. सिमेंटची जंगल! मला त्यामध्ये माझेच घर सापडेना! चिखल तुडवत ज्या घरी मी जायचे, त्या घराचा रस्ता मला त्या दुकानांमधून व बंगल्यामधून सापडेना! माझे घर हरवले आहे!

माझे गाव हरवले आहे.

माझे नाशिक हरवले आहे.

माझ्या गावाची ओळख मंदिरांचे शहर म्हणूनच राहू दे, हिरवाईने नटलेली वसुंधरा खुशहाल राहू दे! तिखट चरचरीत कांद्यासाठी शेतकऱ्यांच्या शेतात पिकणाऱ्या धान्यासाठी हे गाव प्रसिद्ध राहू दे! सोमेश्वरच्या पुढे गंगापूर पर्यंत पसरलेल्या त्या सिमेंटच्या जाळयात आज भक्त काय देवदेखील, दानवसुद्धा गडबडून जाईल.

नाशिकच्या हिरव्या मुकुटाची निगराणी करायला हवी. सध्या तरी ही गाव हरवलेली मुलगी नाशिकच्या हिरव्या खुणा शोधते आहे. तुम्हाला सापडल्या का हो? तुमचे गाव हरवले आहे का?

# १६ नंतर म्हणाल, गेले करायचे राहून

वेळ हाती असतो तेव्हा आऴसाने काहीही केले जात नाही व "गेले करायचे राहून " ही खंत मागे उरते. तसे जीवनाचे वर्गीकरण तीन टप्प्यात करायचे झाले, तर तो पहिला टप्पा नोकरीपुर्वीचा, दुसरा टप्पा कौटुंबिक जीवन+नोकरी असा व तिंसंरा निवृत्ती नंतरचा असे करता येईल. जीवनाला सर्कस म्हटले आहे.

पहला घंटा बचपन हैं, दुसरा जवानी हैं, तिसरा बुढापा

फिर उसके बाद मॉ नाही बाप नही, बेटा नाही बेटी नही....

...... शेवटी पूर्ण विराम! काही करायचे राहून गेल्याची खंत उरते. जीवन त्यातील पहिला घंटा बचपन, सोनेरी क्षण पटकन संपतात. मात्र दुसरा घंटा नोकर, शिक्षण, लग्न स्थिरस्थावर, घर मुले यात जातो. सर्वाधिक कृतींचा व काळजीचा चिंतेचा भविष्य विषयक अवघड निर्णय घेण्याचा हाच काळ असतो.

मी मात्र आज नोकरी- लग्ना नंतरच्या, टप्प्यात शिरण्यापूर्वीच्या व शिक्षण पूर्ण होतानाच्या एका महत्वाच्या परिवर्तन टप्प्याबद्दल लिहिणार आहे.

बालपणीचे शाळा कॉलेजचे दिवस भुरकन उडून जातात. काही करायचे राहून जाते. काहीजणांना कॅम्पस इंटरव्हूतच नोकरी मिळते, काहीजण धडपड करून दुसरी कुठली मिळवतात. काहीजण तात्पुरती म्हणून एखादी पकडतात व नंतर दुसरी शोधू म्हणतात. म्हणता जबाबदाऱ्यांमुळे मिळेल त्या नोकरीत तडजोड करून राहतात. सहज म्हणून पकडलेली नोकरीच आपल्याला पकडते. बेकारीचे प्रमाण खूप वाढलेले असताना नोकरी मिळाली तीच टिकावण्याकडे कल राहतो. जागतिक मंदीमुळे, संधींचे प्रमाण कमी होते व

आपण पगारदार होऊन आहे ते टिकवून धरतो. अर्थात त्यात वाईट काहीच नाही. ज्याची त्याची परिस्थिती व आवड, स्वभाव या नुसार तरुण मंडली, ते ते जमवतात. एखाद्याने नोकरी पकडली नाही तरीही "अरे, ह्याला काय वेड लागले आहे का? नोकरी मिळत नाही वाटते. सर्वच अपेक्षा कशा पूर्ण होणार? तडजोड केली नाही वाटते? " असे उदगार, असे प्रश्न त्याला इतरांच्या नजरेत दिसतात.

नवी नोकरी पकडल्यावर किंवा नोकरी शोधत असताना मन चलबिचल होते. आपले प्रश्न इतरांना सांगणे, संयुक्तिक वाटत नाही. तरुण मंडळी नाराज राहतात. पण अभिमानामुळे, ती बाजू व्यक्तिमत्वाच्या काही मुखवट्यांआड दडून राहते. मी तरुण मंडळींना असे सांगू इच्छीते कि "हे नैसर्गिक आहे. "

या काळाचा सदुपयोग करा. रिकामपणाचा वेळ मेजवानी आहे. भविष्याची चिंता व अनिश्चित करीयारणे तोंडाची चव जाते. पण ज्याने ज्या परमेश्वराने चोच दिली तो खायला दानंही देतोच. आपल्या साठी योग्य नोकरी लवकर किंवा उशिरा मिळते. थोडी तडजोड करायची तयारी सुद्धा हवी. "त्यामुळे "लगे रहो" Apply Apply noReply काम शोधणे, कामाचा प्रयत्न, नोकरी, इंटरव्हूची तयारी, करता करता अन्य सुद्धा काही गोष्टी केल्यास, विचार प्रगल्भ होतात व रिकामपणा टोचत नाही.

या करावयाच्या गोष्टी खालील प्रमाणे असू शकतात.

१) कॉम्पुटरचा क्लास लावून, काही वेगळया गोष्टी शिकणे.

२) एखाद्या सामाजिक संस्थेत काम करणे. उदा. पर्यावरण रक्षण संस्था, वृद्धाश्रम, जेष्ठ नागरीकसंघ

आयुष्याच्या वेगळ्या रंगाचे ज्ञान तुम्हाला होईल. मानवतावादी दृष्टीकोन वाढेल.

३) लायब्ररीतून वेगवेगळी पुस्तके आणून वाचणे. महत्वाची टिप्पणे इच्छा झाल्यास काढणे.

४) मित्रांच्या सतत संपर्कात राहणे.

५) विविध सामाजिक कार्यक्रमाना जाणे.

६) वेगळ्या ओळखी करणे. गाडी चालवायला शिकणे.

७) स्वतःला व्यक्त करा. अभिव्यक्तीने स्वभाव बदलतो. लिहा किंवा चित्र काढा.

८) एखादे वाद्य वाजवायला शिका.

९) योगाचा क्लास लावा. योग म्हणजे फक्त व्यायाम नसतो तर मन व शरीराचा योग (मिलाफ) असतो.

१०) जुन्या नातेवाईक, मित्रांना पत्र लिहा. फोन करा. त्यांच्या संपर्कात राहा. नोकरी बद्दल सांगायचे नसेल तर "प्रयत्न चालू आहे" असे सपक उत्तर द्या.

११) स्वतःचा स्वतः स्वयंपाक करायला शिका. नोकरीसाठी वेगळ्या ठिकाणी राहावे लागल्यास ते उपयोगी पडेल.

१२) आईला घरकामात मदत करा. वडिलांची बिले भरणे, सामान आणणे, घराची किरकोळ दुरुस्ती ही कामे करा.

चांगली नोकरी मिळेल ती शोधत राहा. हाती असलेला हा वेळ मात्र वय घालवू नका पुढे ८ ते ८ नोकरीत गुंतल्यावर हे सर्व करायचे राहून जाईल. नंतर वेऴ नाही.

म्हणाल गेले करायचे राहून!

# १७. फुलपाखराचे पंख

ठाण्याच्या "राजन राजे " यांच्या राजहंस नावाचे कविता संग्रहात एक कविता आहे.

एकदा मी फुलपाखराकडे, त्याचे रंग उसने मागितले.

तेवढ्यानेही, त्याचे कितीतरी वजन घटले!

फुलपाखरासारख्या नाजूक जीवाच्या नाजूकपणाचे वर्णन करायला, याहून सार्थक काव्य पंक्ती कोणती असणार? तर अशीच अनेक नाजूक फुलपाखरे ० ते १८ वयाची हसत, खुशीत बागडताना दिसतात. फुलांभोवती रुंजी घालणारी फुलपाखरे कलासक्त असतात समजून त्याच्यावर पारंपारिक भावना न लादता आपण या फुल पाखरांना भोळी भाबडी व्यक्ती समजू या!

त्या फुलपाखरांच्या भोळया भाबड्या डोळयात वेगवेगळी स्वप्ने असतात. स्वप्ने उद्याची डोळयात माझ्या म्हणत ती तरुणाई आपापले आयुष्य हसत बागडत घालवत असते. त्यांच्या प्रश्नाबद्दल फारसे कुठे लिहिले जात नाही. रंग "उमलत्या मनाचे" "वाटेवरती काचा ग " "त्या अवघड वळणावर" "गंध निशिगंधाचा" अशा विविध नाटकात तरुण- तरुणीचे प्रश्नांन बद्दल उल्लेख केलेले आढळतात. पण - - -

खरे तर अबोध वयातील मुलींची असुरक्षितता या विषयावर कसे लिहायचे समजताच नाही. तो विषयही नाजूक असतो व समाजात या विषयावर उघडपणे चर्चा करणे टाळले जाते. ज्यांना या विषयावर जागरुकता करायचा हक्क आहे ते ह्या विषयावर गप्प बसतात व माझ्या सारख्या नवोदिताला या विषयी कसे लिहावे सुचत नाही, पण गप्पहि राहवत नाही.

तरुण वयातील कोवळीक, गरीब श्रीमंती, जाती-धर्म या पलीकडे एकसूत्रीपणाने, परलिंगीआकर्षण असते. फुलाने कितीही ठरवले कि गंध लपवायचा, तरीही तो लपवणे अवघड असते. तसे तरुण व तरुणाईच्या खुणा लपवणे अवघड असते. सुंदर व नजरेत भरण्यासाख्या तरुणींना वेगळीच भीती असते. स्त्रीच्या मागे अजगरा प्रमाणे फिरणारी नजर, कधी मॉडेल्स, तर कधी फिल्म स्टार्स, तर कधी अन्य - कुणाच्या रूपाने हा फुलपाखरू मारणारा राक्षस, हा फुलपाखरू पकडणारा ट्राप समोर येऊ शकतो. "सातच्या आत घरात" चे बंधन ठेऊनही संकटे येऊ शकतात. आयुष्य उध्वस्त होऊ शकते. ही भीती उरतेच.

“कुणाला काय सांगावे? कुणाला काय हो त्याचे? ”

"इथे हे ओढती मागे, मला बांधुनी पाषाणी”

मरती रही सबको खुश करने, बिमारी में भी खाना पकाने

पर सासने मारे ताने| बलम बेवफा निकला रे!

फुलपाखराला आकर्षक पंख देवाने दिले आहेत. ते पंखच त्याला असुरक्षित बनवतात.

घरी भीती घरवाल्यांची

रानात भीती श्वापदांची!

अमर्याद वाढलेल्या लोकसंख्येमुळे कुणाचा पायपोस कोणाच्या पायी राहिला नाही. हा प्रश्न इतरांचा आहे, म्हणून दुर्लक्ष करून चालणार नाही. हा प्रश्न कधीही, कुठेही, कुणावरही, कुणासमोरही जबडा कधीहीआ वासून उभा राहू शकतो. संध्याकाळी लोडशेडिंग मुळे अंधारात, कधी गर्दीचा फायदा घेऊन, कधी आपण पोलिस आहोत अशी खोटी बतावणी करून फुलपाखरांना जाळ्यात गाठले जाते.

मदतीचा लिफ्ट देण्याचा बहाणा करून, गैरफायदा घेतला जातो.

स्त्री विषयक दोन महत्वाचे फायदे आहेत. महिला पोलिस सोबत असल्या खेरीज स्त्रीला अटक करता येत नाही. सूर्यास्ता नंतर स्त्रीला अटक करता येत नाही. त्यामुळे असा काही प्रसंग आल्यास प्रथम आपल्या घरी आई वडिलांना किंवा हितचिंतकांना बोलावून घ्यावे. एखाद्या वरिष्ठाला किंवा प्रतिष्ठिताला, समाज सेवकाला फोन करून मदतीला बोलवावे.

असे हे गुन्हे, हे आघात कुणा एका व्यक्तीवर होतात पण त्याचा प्रहार संपूर्ण मानवी जातीवर होतो. फुलपाखरांनी आपले पंख मजबूत करायचा प्रयत्न करावा. पोलिसांनी महीलांची काऴजी घ््यावी

पोलिसांचा फोन नंबर - १०० 

अन्य गुन्हे - १०३

एक सामाजिक प्रार्थना करायला हरकत नाही

"पापाची वासना नको देवू कोणा

जनातून माती उठता भली |

# १८. सैराट प्रेम

(शृंगाराचा अतिरेकवीर रसांचा अभाव)

व्हॅलेनटाइन डे चे बातमीपत्र त्या जाहिराती बघून कसे तरीच झाले. चंद्रकिरण आषाढाच्या धारा, श्रावणसरी मोत्याचे दाणे, अळवा वरच पाणी, बहरलेला वसंत, चैत्राची पालवी, ग्रीष्मातील तप्त झळा असे वेगवेगळे शब्द वापरून "त्या ढाई अक्षर प्रेम के" चे केलेले वर्णन ऐकुन मी वाढले। आजचे सैराट बघून बिचकले आहे. प्रेमासाठी म्हणे हिरे, सोने, फ्ल्याट खरेदी अशी बक्षिसे देतात, व्हेलेनटाइन डे ची उलाढाल कोट्यावधी रुपयांची असते. व्हॅलेनटाइन डे म्हणे, व्यापाऱ्यांचा कमाई दिन असतो व प्रेमाचे मार्केट कोट्यावधी रुपयांचे असते. हे शृंगारिक प्रेम असते. खरे तर देश प्रेम हे सुद्धा प्रेमाचाच प्रकार आहे ना! मग २६ जानेवारी व १५ ऑगस्टला हे प्रेम कुठे जाते? दोन रुपयाचा झेंडा घ्यायचा व नंतर तो कुठेतरी टाकूनही द्यायचा. सलग सुट्ट्या जोडून घेऊन पर्यटनाला जायचे. एकूण काय तर करमणूक, मजा, व चंगळवादच त्याही दिवशी जोपासायचा. देश प्रेम उरले आहे का? असा प्रश्न पडावा अशीच अंतर- परिस्थिती आहे. या सर्वांवरून काय दिसते? देशप्रेमाचा व वीर रसाचा अभावच समाजात निर्माण झाला आहे का? देशप्रेम फक्त वीर जवान व सैनिकांसाठीच, दोन दिवसापुरते उरले आहे का? शारीरिक प्रेम हा एकमेव अर्थ प्रेमाचा उरला आहे का? वेड लावणाऱ्या दूरदर्शन वरचे कार्यक्रम बघा. अप्सरा आली. नृत्य - विनोदाचा अतिरेक. एका नव्या प्रकारच्या, तमाशा पटांची लाट आली आहे. उत्सवांचा अतिरेक होतो आहे. हे उत्सव म्हणजे मूळ प्रश्नाला बगल देऊन लोकांना फिलगुडच्या अफूच्या गुंगीत, धुंदीत गुंग ठेवायची नशा आहे. पूर्वी घरी अपमृत्यू झाला कि दुःख विसरायला दारू पिण्याचा प्रकार काही घरी होता. पुढे सण- आनंद-पार्टी या साठीही दारूचीच नशा वापरली

गेली. एकूण काय मूळ प्रश्न विसरून जाण्यासाठी नशा वापरणे, हा एक वेगळाच पायंडा पडला. उत्सवांच्या रूपाने तोच पायंडा पडतो आहे का? आपले देशप्रेम दिखावूच उरले आहे का? भारत छोडो म्हणून परदेशी जाणे! देशाचे प्रश्न युद्ध भूमीवरील सैनिक, त्यांची दुःखे, आपण विसरतो व शृंगारिक प्रेम खरे मानतो. प्रेम जहरी -जहरी म्हणतात तेच खरे. किंबहुना प्रेम म्हणजे काय तेच कळत नसावे

या मनाचे त्याचे न्यारच तंतर,

अरे इच्छू साप बरा त्याले उतारे मंतर

असे प्रसिद्ध कवियित्री बहिणाबाई चौधरी म्हणतात. हो! असा हा शृंगारिक प्रेमाचा ओव्हर डोस कमी व्हायला हवा. पण लक्षात कोण घेणार व उतारा कोण करणार? प्रेमाचा डायबेटीस झाल्यावर? हे सैराट प्रेम कुठे नेणार आहे

# १९. पुन्हा नाही येणे आता

कधी कधी अपयशानंतर स्थलांतर करावे लागते ते नाईलाजानेच असते. लादलेले असते. खूप आवडीने स्वखुशीने आसुसून एखाद्या स्वप्नवत वास्तूला, ड्रीम प्रोजेक्टला किंवा पर्यटन स्थळाला आपण भेट देतो. समरसतो, सजतो पण हळूहळू आपल्याला त्याच त्या सर्वांचा कंटाळा येतो. तो रस शोषून आपला त्या जागेतील रस संपतो. काही चुका जाणवतात, काही होतात, काही गोष्टी उगीचच खुपतात. मग रस्ते बदलतात मुक्काम हलवतात व आपल्याला नवीन वाट शोधण्यासाठी एकट्याने बाहेर पडावे लागते. स्वार्थाने लिप्त नाती कधी फसवतात, कधी नियतीच फसवते.

Relationships are like Bank transaction.

you lose interest after withdrawal.

जागेची स्वप्ने झोपेत पडतात पण ती साकारण्यासाठी जागे होऊन वास्तव बघावे लागते. चघळून चघळून, चोथा झालेला घास, पानाचा तोबरा किंवा चुइंगम अधिक काळ तोंडात ठेवणे शक्य नसते. मग त्या नात्यातून बाहेर पडावेच लागते. कधीकधी ती नाती सोडून जाण्याचा निर्णय दुखद असतो. तरीही मग चेहऱ्या वर कृत्रिम हसू ठेवून वावरावे लागते. मनाला समजवावे लागते

न मुह छिपाके जिओ और ना सर झुकाके जिओ

गमोका दौर भी आये तो मुस्कुरके जिओ |

फळे कुस्करल्या शिवाय रस निघत नाहीत. फुले कुस्करल्या शिवाय अत्तर बनत नाही. जीवन कुस्करते, तेव्हा व्यक्तिमत्व घडते. वेदनांनी माणसाच्या डोळयात अश्रू येतात. वेदनेचा उगम त्या डोळ्यातच होतो. अश्रुना परतवायला खूप मोठी शक्ती लागते. खूप

वेगळयाच फ्रेम मध्ये स्वतःचा चेहरा बघून, स्वतःचा अभिमान दूर ठेवून, अपमान सोसून, मानसिक त्रास व भावनेचा झंझावातातही तरुन जावे लागते. त्याला पर्याय नसतो. हेच दिवस हे स्वप्नाच्या शेवटाचे असतात. पण तीच तुमची परीक्षा असते. याचवेळी तुम्ही नवीन औपचारिक नाती, मानवता अशा ग्रेसफुल गोष्टींचा विचार करता. Adversity is a crucible which tests a manआगीतच मग तावून सुलाखून सोने चमकावे तसे पुढे जावे लागते. आपण फसलो म्हणून स्वतःची दया करून काय उपयोग? कडक लक्ष्मि सारखे, आपणच फटके मारून सहानुभूती मागून काय उपयोग? तुमचे आयुष्य, तुमचे निर्णय तुमची फरफट तुम्हीच बघायला हवी. सहन करायला हवी. राखेतून फिनिक्स पक्षी पुन्हा जसा उदयास येतो तसे पुन्हा घडा, घडवा! या जगात त्या परमेश्वराच्या इच्छे शिवाय, झाडाचे पण सुद्धा हलत नाही. त्या परमेश्वरानेच हे तुमच्या नशिबी लिहिले होते. त्या परमेश्वरानेच हे तुमच्या नशिबी लिहिले आहे. why me? म्हणून रडून उपयोग नाही. युद्धात गावेच्या गावे, उध्वस्त होतात पण ती माणसे विस्थापित होऊन स्थलांतर करतात. नवीन गाव वसवतात.

जुन्या गोष्टी मागे टाकून पुढे जात राहतात. तो पूर्णविराम नसतो. चूक झाली ओके, ठीक आहे. काम करताना चुका होतात व अनोळखी वाटेवर धोके असतातच, अपघात घडतात. अपयश येते, स्वप्न तुटते, बदनामी होते. Aship is safe in harbour. But itisnotaplacewhereitismeant to be सुरक्षितता हवी तर स्वतःला गाडून अशमी बनवावे लागेल. किंवा डोअर म्याट सारखे पडून राहावे लागेल. तुम्ही वेगळया आहात म्हणून देवाने ह दुःख देण्यासाठी तुम्हाला निवडले. शिकार वाघाचीच होते, बिळात राहणाऱ्या उंदरांना कशाचेच भय नसते. सीता मातेलाहि वनवास सहन करावा लागला. व प्रभू श्रीरामांना विरह नशिबी आला.

हि वाट तुम्ही मागे सोडा|

नवीन पाऊल वाट शोधा|

झाडा झुडपांचे काटे टोचू देत|

पायाखाली साप सळसळू देत |

हि तुमची नवी वाट आहे |

तुमच्या नव्या आयुष्याची पहाट आहे |

मागे पडले आता सर्वसमभावी|

पुन्हा नाही येणे आता या गावी |

पुन्हा नही येणे आता संधी नाही |

वळून मागे पाहू नको कधी ही |

सख्या पुढे पुढेच जाई |

पुन्हा नाही येणे, परत रस्ता नाही |

# २०. आत्ताचा क्षण

जगातला सर्वात श्रेष्ठ हा आत्ताचा क्षण आहे, वर्तमानातला क्षण आहे.

पल पल पल पल पल पल हर पल

कैसे कटेगा पल हर पल?

असे आपण म्हणतो मात्र वेळ कसा निघून जातो माणसाला कळतसुद्धा नाही. काही दिवसाचा कंटाळा आला. "आज दिवस संपता संपत नाही" मात्र वर्षाचे कॅलेंडर पटकन उलटून जाते. जन पळभर म्हणतील हाय हाय, मधील पळ म्हणजे "पल" क्षण! Days Do not pass but year fly away साधारणतः काळ भरभर निघून जातो आहे याची जाणीव केसामध्ये एखादी रुपेरी रेषा चमकली कि होते. पहिला पांढरा केस प्रत्येकालाच खूप खूप अस्वस्थ करून जातो. आयुष्यातील काही करायच्या गोष्टी अगदी करायलाच हव्यात, अशा गोष्टी व करण्याचे स्वप्न असलेल्या गोष्टी, इच्छा असलेल्या गोष्टी- to do, must do, wish to do, dream to do यांची यादी मोठी असते. पुढे बघू म्हणून आपण त्या गोष्टी टाळत राहतो.

आयुष्यभर, पल पल, महाराष्ट्रीयन माणूस मरण्या पूर्वी त्या पंढरपूरच्या विठोबाला जायचे म्हणतो. तर सधन असेल तर काशीयात्रेला जायचे स्वप्न बघतो. बद्रीनाथ यात्रेला तर म्हणतातच "गया बद्री, काय सुद्री " म्हणजे देहरूपी आयुष्य संपले, आत्म्याचा प्रवास सुरु झाला. काळ माणसाला नेहमी हरवतो. काळाने आपला पराभव केला ही

खेददायक भावना येण्यापूर्वीच आपण आयुष्याचे ध्येय ठरवून योजना आखणे, आवश्यक असते.

उगीचच काहीतरी अगम्य लिहित नाही. जसे बघा- तुम्हाला काय हवे? मुले सेटल व्हावी, स्वतःचे घर व्हावे. एखाद्या यात्रेला जावे. जुन्या मित्रांना भेटावे. मग त्या योजना आखल्यास व इच्छा पूर्ण झाल्या तरीही, आपणास, काळाने आपल्याला फसवल्याची, वय उतरण्याची टोचणारी जाणीव उरत नाही. मृत्यूला सामोरे जायला धैर्य येते. "पल पल दिलके पास तुम रहति हो. " असे म्हणत भूतकाळातून काही प्रेरणा घेऊन, पुढे जाण्याऐवजी आपण बऱ्याचदा त्या जुन्या आठवणीत समरण रंजनात रमतो. वर्तमान जगायला विसरतो. उदा. अपमानाचा बदला घेण्याची भावना, जेव्हा त्या अंतरमनात ठसठसत राहते आपण दुखावतो. भविष्यातील स्वप्नांसाठी वर्तमान विसरतो. उदा. जो पर्यंत माझी अमुक एक इच्छा पूर्ण होत नाही, मी हे खाणार नाही. मी गावी जाणार नाही. नवीन कपडा घेणार नाही. पैसे साठल्यावर हे करेन! वेळ मिळाला कि ते बघू, तेव्हा हे करू या! राजे महाराजे, भूतकाळातील गत वैभवाच्या आठवणींमध्ये, वर्तमान हरवून बसतात. आपण जुन्या नात्यांच्या गुंत्यांमध्ये गुंततो.

दो पल था ख्वाबोका कारवा, फिर तुम चल दिये, तुम कहा हम कहा!

मानव साधा, तो गोंधळून जातो. ते वयच असे असते कि माणूस साधारण या वर्तमान नात्यांना न्याय देऊ शकत नाही. हवे ते काम न मिळाल्याने मन तडजोड करत राहते. व डेड लाईन पूर्ण होण्याची आपण वाट बघतो. उदा. मी निवृत्ती नंतर हे करीन, मात्र ते आता थोडावेळ करून, बघायला काय हरकत आहे. वेळ नाही ही सबब असते. वेळ तेच काढू शकतात जे खूपच बिझी असतात. त्यामुळे माणसाने नेहमी वर्षभराचे नियोजन करावे. स्वतःसाठी वेळ काढावा. सुख म्हणजे जादूची छडी नाही, सुख तुमच्याच जवळ आहे. हे जाणा! रोजच्याच त्याच त्या गोष्टीतील एखादी गोष्ट करायची राहिली तरी चालेल, पण जे हवे ते करून घ्यावे. छोट्या छोट्या गोष्टींसाठी वेळ काढावा उदा. सूर्यास्त बघणे. फुले खरेदी,

मित्राला फोन करणे, आईला भेटणे, फोन करणे, पर सेकंद बिलिंगच्या जमान्यातही वेळ काढायलाच हवा. भाषणाला जाताना एखादे पुस्तक जवळ ठेवावे. गाडीत कानाला वॉकमन लावून गाणी ऐकावी. प्रवासातच फोन करून घ्यावेत. पेपर वाचणे, तिथेच उरकावे, कधी पासून जे करायचे ठरवले होते ते उरकून घ्यावे.

सारी जिंदगी मरमर के जी लिए

इक पल तो अब मुझे जिने दे जिने दे

सुट्टी वाचवणे. पैसे साठवणे, घर खरेदी ही सर्व कामे महत्वाची आहेतच, मात्र सर्वात महत्वाचे आहे, ते हा आत्ताचा क्षण जगणे. म्हणजे या क्षणाचा आनंद घ्या. मी चंगळ व मजा करण्याचा संदेश देत नाही तर जाणीव देते आहे कि वेळ पुढे जातो आहे. त्याच्याशी कुणीही शर्यंत जिंकू शकत नाही. काऴ पऴतो, उडतो तुमच्या माझ्यासाठी थांबणार नाही. आजचा ओंजळ भर आनंद जगून घ्या! अर्थात हा आनंद निर्मळ कौटुंबिक आनंद असू दे, कलेचा, छंदाचा आनंद असू दे!

आनेवाली कलकी खातीर
आज का ये पल मत खोना
आगे भी जाने ना तू
पीछे भी जाने ना तू
जो भी हैं बस यही इक पल हैं
अनजाने सायो का, राहो में डेरा हैं

ये पल गवांना ना, ये पल ही तेरा हैं

जिने वाले सोचले, यही वक्त हैं करले पुरी आरजू!

आता तर जगायला सुरुवात करणार मी,

कुणालाच नसते फिकीर इतरांची
जाणली आहे मी ही जननीती
आज जरी मला वाटते मृत्यूची भीती
तरी जगण्याची करणार सुरुवात मी.

# २१. साभार परत आलेले

अहो! नाही नाही घाबरू नका वाचक हो. अनेक प्रकाशकांकडून साभार परत आलेले लेख किंवा काहीही मी लिहून तुम्हाला रंजीस आणत नाही! तसे हल्ली ज्ञानाचे भांडार पसरले आहे. प्रकाशनाच्या अनेक संधी प्राप्त झाल्या आहेत. प्रसिद्ध झालेल्या पुस्तकांपेक्षा अप्रकाशित पुस्तकांची संख्या अनेक पटीने अधिक आहे. ही पुस्तके लिहिणाऱ्याना काहीतरी सांगायचे आहे. ते प्रसिद्ध करून नाव - यश मिळवायचे आहे. प्रकाशकांकडे पुस्तकांचा पाऊस येउन पडतो. प्रकाशक अधिक चांगले लिहून एडीट करून आणा म्हणतात. पण पुनर्लेखनात, लेखकाची मूळ कलाकृती रिमिक्स होते व तिच्यात ती मुलभुतताच रहात नाही. तसे प्रत्येकालाच हल्ली लेखक व्हायचे असते. जगभरातील पाहणीत, पहिली इच्छा- श्रीमंत होणे, दुसरी इच्छा- वजन कमी करणे व तिसरी ईच्छा- पुस्तक प्रकाशित करणे होती. त्यामुळे प्रकाशकांकडे अंदाजे रोज ४ पुस्तके येतात जी प्रकाशन योग्य नसल्याने साभार परत केली जातात.

विज्ञान, आत्मचरित्र, स्वयंपाकाच्या पाककृती. टिप्स, सौंदर्य, प्रवासवर्णन, कथा कादंबऱ्या, थरारकथा, सिनेमा बद्दलचे लेखन, व्यक्ती महात्म्यअशा विविध क्षेत्रातील लेखन प्रसिद्ध होते. काही लेखक माझे पुस्तक येणार आहे, अशी दवंडी पिटतात. तर काही सांगत नाहीत. अर्थात यश हे प्रत्येक व्यक्तीचे व पुस्तकाचे नशीब असते.

success is a chance

खूप गाजावाजा झालेले पुस्तक, डब्यात जाऊ शकते व एकदम असे अज्ञात व्यक्तीचे पुस्तक गाजू शकते. लेखकाचा कल अपमान न सांगण्याकडे असतो. अपयशाची भीती, लोकापवाद, टीका, आधी सांगितले, कि काम बिघडते ही अंधश्रद्धा असते. यामुळे गुप्तपणे लिखाण करणारे बरेच असतात. शिवाय या पुस्तकाला प्रकाशक मिळणेही आवश्यक

असते. कारण आर्थिक दृष्ट्या पुस्तक प्रकाशित करणे, लेखकाला परवडणारे नसते. प्रकाशनासाठी एक पुस्तक रखडले कि निराश होवून दुसऱ्याचे काम मी सुद्धा थांबवलेच होते. लेखक म्हटले कि भिवई उंचावणारे व लेखकाला भणंग समजणारेही असतात. कुणीतरी ओळखीचे असेल, त्याच्या मार्फत प्रसिद्ध केले असेल असे म्हणणारेही भेटतात.

लिखाणाला मूड लागतो, वेळ लागतो, साहित्य लागते व उघडपणे काही वेगळे लिहिण्याचे धैर्य लागते. लेखक घाबरतो-माझ्यावर टीका होईल, ज्या व्यक्तीच्या आयुष्यावर हे लिखाण घेतले ती काय म्हणेल? आणि लोक माझ्याबद्दल वाईट मत करतील, मला हसतील, असे विचार मनात आले कि लेखक संपतो.

शिप इज सेफ इन हार्बर, बट इट इज नॉट मिंट टू बी देअर

जिंदा लेखक खाक का, मर गया तो दस लाख का!

असे वाटून प्रवाह पतित, अशी ओरीजिनालीटी गेलेली जहाजे भरकटतात, मग वर्णने, व्यक्ती महात्म्ये, सिनेनट वर्णने, आंबटकथा, अशा फिलगुड लिखाणाने, काही काळ गाजवतात. स्त्रीला लेखिका होणे खूपच अवघड जाते. सर्व कामे करून रात्री सर्वजण झोपल्यावर, घुबडा सारखे जागून, तिला लिहावे लागते. Harry potar ची लेखिका जे. के. रोलिंग ही घटस्फोटीत महिला, मुलगा झोपल्यावर रात्री, दिवसा नोकरी करून, वेळ काढून लिखाण करी. पुस्तक प्रकाशनानंतर आपले दिवस बदलतील, हे स्वप्न ती पाहत असे. तिचे ते स्वप्न पूर्ण झाले. अर्थात सर्वजणांचे असे सदभाग्य असतेच असे नाही. खूप कष्ट करूनही, ते लेखक अज्ञातांच्या यादीत व निराशेतच फेकले जातात.

'प्यासा' चित्रपटाचे नाव 'टाइम' म्यागझिनने, जगभरातील, सर्वोत्तम चित्रपट निवडल्याने लेखकांच्या प्रश्नांबद्दल जाण, पुन्हा समाजात निर्माण होईल, असे वाटते. लेखकांची, कवीची लिखाणाची पुस्तके रद्दीत विकणारे, त्या लिखाणांवर जीव टाकणारे, त्याच्या खोट्या कथित मृत्यूचेही भांडवल करणारे, जग पाहून त्या प्यासाच्या मनातील

लेखक मरून जातो. लेखकांची ही अशी दशा-दुर्दशा होते हे माहित असूनही, ‘प्यासा’ लेखक अनाम तहानेने लिहित असतो. प्रकाशकांकडून साभार परत आलेले, लेख उराशी धरून जखमी होतो. success has many takers, failure has only one! साभार परत आलेले, साहित्य सुद्धा लेखकाला प्रिय असतेच! कधीतरी त्या परत आलेल्या खोट्या ठरवल्या गेलेल्या, शिक्क्याला नाण्याला सुद्धा किंमत येईल. 'ते नाकारलेले नाणे ही खणखणीत वाजेल", वेडे कुरुप पिल्लु राजहंस ठरेल ही आशा ऊरते. काही जातीय वादी लोक, काहि अन्य जातीतील लोकांना पुढे येऊ देत नाहीत

साभार परत आलेल्या, त्या अनेक अनाम लेखकांच्या लेखांना, अप्रकाशित साहित्याला ही भावपूर्ण श्रद्धांजली!

# २२. काय भुललासी वरलिया रंगा

माझ्या मैत्रिणीची सासूची, पांढरे स्वच्छ कपडे घालून, अध्यात्माच्या गोष्टी करत, हातात भगवत गीता घेऊन बसलेली, ती आकृती बघून मी त्याना वाकून नमस्कार केला. कपडे, राहणी व त्यांच्या त्या भल्या थोरल्या गप्पा ऐकून, मी प्रभावित झाले. बाहेर पडताच माझी मैत्रीण म्हणाली "फसलीस ना? " अगं, दिवसभर, सर्व मालिका बघतात. घरी काम असेल, कामवाली बाई आली नसेल तर पोळया करायच्या वेळी, त्या मुद्दाम देवळात जातात किंवा जपाचे नाटक करतात. सारखे कपडे खरेदी करतात व दागिन्यांसाठी हपापल्या आहेत.

कोणत्याही प्रकारची निवृत्ती न मिळवू शकलेले लोक "आम्ही कि नाही, spiritual लोक आहोत" अशी वाक्ये फ्याशन म्हणून टाकतात. विकृती प्रवृत्ती व निवृत्ती या सामान्यतः सामान्य मानवाच्या प्रकृती रूपाने, प्राप्त नैसर्गिक वृत्ती असतात. मात्र काही व्यक्तीमध्ये हल्ली बाय- पोलर डिसऑर्डर आढळते. भोग व अध्यात्म या दोन पोल्स मध्ये ही माणसे वावरतात. टीव्ही वरच्या फालतू सिरिअल मालिका, बघून ही माणसे खूप रमतात. डॉक्टर जसे रुग्णाला "थ्री टाइम्स अ डे" घ्या असा सल्ला देतात. तशी ही माणसे एकच सिरिअल तीन वेळा बघतात. मात्र घरचे काम करण्याचे वेळी त्यांना झोप, जप करणे. देव दर्शनाला जाणे अशी महत्वाची कामे आठवतात. "आम्ही आता म्हातारे झालो निवृत्त झालो" असे हे लोक त्यावेळी पालुपद लावतात. म्हणजे त्यांची निवृत्ती कामापासून असते, मनोरंजनाच्या त्या अतिरेकातून किंवा अतिरेकी मनोरंजनातून नसते.

आम्ही गुरु केला आहे. प्रेम व दयाभाव गुरूने शिकवले आहेत, हे सांगत ही मंडळी गावोगाव फिरतात. हातोहात पर्यटन, मौज मजा, घरची जबाबदारी टाळणे ही कामे

सुद्धा होतात. ह्याच लोकांच्या मनात गरजू माणसांबद्दल, घरच्या लोकांबद्दल, अजिबात स्नेह नसतो. स्वतःच्या नातवंडाना जवळ ना घेणारी वृद्धा/ वृद्ध परमेश्वर, विवेकानंद स्वामी वगैरे गप्पा मारून इतरांना हातोहात फसवते/फसवतो, मात्र नातेवाईकांबद्दल विष पसरवते/तो. नाते संबंध जोडण्या ऐवजी "नाती तोडा" असा अतिरेकी सल्ला, मुला नातवंडाना दिला जातो. क्षमा, दया, शांती, ही किती श्रेष्ठ आहे, हे शब्द वर्णन अशी व्यक्ती साद्यांत करते. पण नातेवाईकाना मदत करताना, भेटताना, "अडलंय माझ खेटर" म्हणते. आजारी व्यक्तींना घरी सोडून, आश्रमांचा अतिरेक करीत फिरणे हे कुठल्या अध्यात्मात सांगितले आहे? आपले काम मन लावून करणे, दिलेले कर्तव्य चोख पार पाडणे हे अध्यात्मच आहे. घरकाम, व नोकरी व इतर सर्व कामे करून, तरुण वयात हृदय विकार किंवा अन्य आजाराला तरुण बळी पडतात. हे वृद्ध, अति वृद्ध मजेत राहतात. बाहुली प्रमाणे सजून बसणे व फक्त उपदेश हे जेष्ठ करतात. शरीर हात पाय चालत असताना हे लोक जबाबदारी टाळून मजा करीत फिरतात. त्यंनी मजा करावी पण घरात मदत देखील करावी. वेऴ वाया घालवून, वर मुलांना देतांना वेळ नाही म्हणतात. तरुणांना वेऴ नाही कारण तुम्ही तरुणांची कामे करु शकत नाहीत, शक्य तेव्हा मदत करीत नाहीत) काम घरकाम टाळण्यासाठी व बांडगुळा प्रमाणे तरुणांच्या जीवावर जगणे योग्य? घरची कामे टाळणे व शिवाय अध्यात्माचा आभास निर्माण करणे, अशी बाय पोलर ढोंगी विकृती आज काहीजणांत, समाजात वाढते आहे.

काही घरी मालिकेच्या ब्रेक मध्ये जपमाळ घेऊन, जप करणारे आजी-आजोबा आहे. काही घरी मुलांच्या अभ्यासाचे वेळी, जोरजोरात तो टीव्ही लावणारे आजी-आजोबा मी आता निवृत्त झाले, अध्यात्माकडे वळले अशी वल्गना करतात तेव्हा, तो सर्वात मोठा विनोद असतो. रसिकतेने जीवनास्वाद घ्यावा पण बायपोलर? कित्येक अध्यात्माच्या कार्यक्रमांमध्ये, अधून मधून दागदागिने, साड्या, शेअर्स व पर्यटनाच्या जाहिराती असतात. चार आरत्या, दहा मंत्र भरपूर चमचमीत खाणे, अधिक सर्व पर्यटन स्थळे पाहणे, हा "यात्रा" या शब्दाचा अर्थ आहे का? आळशी व वेळच्या वेळी आयते खायला, चटावलेली काहि

मंडळी, संपूर्णपणे उपभोगवादि आहेत. "गरजेल तो पडेल काय? " उपभोगात बरबटलेपण, त्या गरीब मुखवट्या आड झाकतात. आमच्या शाखेत एक बुवा नावाचा गृहस्थ कपाळी टिळा लावून येतो. चार ज्ञानेश्वरीची वाक्य फेकणे व थोडे इम्प्रेशन मारणे, एवढाच उद्देश अध्यात्मात उरला आहे का? "वरून कीर्तन, आतून तमाशा" ही मनोवृत्ती लपविण्यासाठी, बुवाबाजी करत फिरणारे बुवा, तांत्रिक महाराज, यांच्या पासून समाज कधी मुक्त होणार? निवृत्ती फक्त कामातूनच? मनोरंजनाच्या अतिरेकातून का नसते? खेड्यात सोंगाड्या येतो व कीर्तनकाराचे रूप, तो बहुरूपी हुबेहूब रचतो. तसेच हे सोंगाडे खोटेपणाने काही कारणांसाठी, पैशां साठी अनेक घरे उध्वस्थ करतात.

साधी माणसे त्यांच्या त्या सोंग आणण्याला फसतात. अंधश्रद्धा निर्मुलना बद्दल काही ठोस पावले उचलणे व कठोर कायदे करणे आवश्यक आहे. तसेच निवृत्ती चा आजार झालेल्या, वरकरणी ढोंग करणाऱ्यां या तथाकथित, निवृत्तांपासून, विरक्तांपासून सावधान!

ऊस डोंगा परी रस नाही डोंगा

काय भुललासी वरलिया रंगा!

अध्यात्माचे नाटक करणाऱ्याच्या मुखवट्याना भुलू नका. परमेश्वर सांगतो,

नांदतो मी स्वेद गंगेच्या तीरी

जिथे राबती हात तेथे हरी

जगात त्या अध्यात्माचे रूप असणाऱ्या सज्जनांइतकेच कष्टकरी देखील श्रेष्ठच आहेत.

# २३. जाने वो कैसे लोग थे?

टाइम्स म्यागझीन ने निवडलेल्या खास प्रेम चित्रपटात प्यासाचे स्थान पाचव्या नंबरवर आहे. त्या "प्यासा"चे हे गाणे डोळ्यात पाणी आणणारे आहे.

जाने वो कैसे लोग थे, जिनको प्यार को प्यार मिला

हमने तो जाब कालिया मांगी, काटोका हर मिला ||धृ ||

खुशियोनकि मंजिल ढूंडी तो गम कि राह मिली

चाहतके नग्मे ढूंडे तो आहे सर्द मिली

दिलके बोझ को दुना कर गया वो गम सार मिला || १ ||

बिछुड गया बिछुड गया बिछुड गया हर साथी देकर पल दो पलका साथ

किसको फुरसत हैं जो थामे दिवानोका हाथ

हमको अपना साया तक अक्सर बेजार मिला || २ ||

इसकोही जिना कहते हैं तो हमभी जी लेंगे

उफ़्फ़ न करेंगे लबसी लेंगे आसू पी लेंगे

गमसे अब घबराना कैसा गम सौ बार मिला ||३||

चित्रपट प्यासा

जीवनात यशस्वी झालेले प्रेमात आकंठ बुडालेले व खरे प्रेम करत असलेले, लोक कोण असतात? साहीर लुधियानवीच्या या गाण्यात जो दर्द आहे तो खूपच आपलासा वाटतो. साध्या माणसाला, नेहमीच येणारे अनुभव या गाण्यात वर्णन केले आहेत. लेखकाला टीकेचा रोष नेशामीच सोसावा लागतो. "जिंदा लेखक खाक का, मर गया तो दस लाख का" अशी त्याची किंमत असते. मलाही नेहमी वाटते, काही लोकांना इतके सुख कोणत्या भाग्याने मिळते? रस्त्यात चार खड्डे असतील व ते चुकवत मी चालले तर, पुढच्या मोठ्या खड्ड्यात मी पडते. मी प्रेमाच्या मैत्रीच्या अपेक्षेने, कुणाजवळ गेले कि ती व्यक्ती पैसेच मागते. कुणाची सेवा केली, तर ती व्यक्ती तो आपला हक्कच समजून मला गृहीत धरते.

चांगुलपणाने काही वागावे, तर पदरी निराशाच येते. मुंग्यांनी झुंडीने दंश करावा तसे दंश करणारे भेटतात. कविता साभार परत येतात, लेख अपेक्षित यश देत नाहीत. खरेच कोण असे लोक आहेत, ज्यांना प्रेमाच्या बदल्यात प्रेम मिळते. सत्य असते व ते खरे प्रेम असते व्यवहार किंवा सौदा नसतो. मला जेव्हा कळयांची अपेक्षा असते, ती अपेक्षा केली काटेच मिळाले.

लेखक या गाण्यात म्हणतो. आशिकीचे, गुंतवणुकीचे गीत मी म्हटले, त्याची प्रतिक्रिया दर्दभरी आह मिळाली. मनाच्या वेदना वाढवणारेच, प्रेम मिळाले. मी प्रेमाच्या बाबतीत तहानलेलाच राहिलो. सोबती मला सोडून गेले. प्रत्येक सोबती काही काळ

फायद्यासाठी सोबत देत राहिला. माझ्या सारख्या दिवाण्या, खुळ्या कलाकाराची साथ द्यायला कुणाकडेच वेळ नव्हता. माझी सावलीसुद्धा मला कधी आनंदी दिसली नाही. मी सोसतच राहिलो. तरीही शेवटी लेखक म्हणतो -

जर हेच जगणे आहे, तर मी जगेन

मी वेदनांनी तळमळताना, शिव्याशाप देणार नाही

ओठ मिटून घेईन, अश्रू पिवून टाकीन. मला आता एकाकीपणाची व दुःखांची सवय करायला हवी. दुःखाला घाबरून कसे चालेल. दुःख तर शंभर वेळा मिळाले.

विरह वेदनेने तळमळणारा व तरीही जगण्याची असफल कोशिश करणारा, हा लेखक हा स्ट्रगलर, आपल्याही मनात कुठे तरी असतोच. म्हणूनच तर मी लिहिलेय, प्यासाचे हे गीत मला माझेच गाणे वाटते. प्यासाचे यश त्याच्यातच आहे. गुरुदत्तला हीच श्रद्धांजली म्हणायची कि चाळीस वर्षा नंतरही गुरुदत्तचे दुःख आपलेसे वाटते. तो विरह त्या वेदना जणू काही आपल्याच आहेत असे वाटते.

पैशासाठी किंवा बदल हवा म्हणून हळव्या प्रेमाचा अव्हेर करून, दुसरा पार्टनर, जीवनसाथी शोधणारी, ती नायिका/नायक आजही जवळपास बघायला मिळतात. प्यासामध्ये लेखकाची हस्तलिखित पुस्तके, रद्दीत विकली जातात व पुढे मात्र त्याच्या मृत्यू नंतर त्याच्या पुतळा बसवला जातो. उपाशीपोटी फिरणाऱ्या एका कवीचे नाव म्हणे नंतर उड्डाण पुलाला दिले गेले. कला व लक्ष्मि एकत्रपण वावरातच नाहीत कि वावरू शकत नाही.

भारतात, लिखाणाबद्दल ५०० रु. वगैरे मानधन मिळते. परदेशातील Harry Pottarच्या लेखिकेला कोटीच्या कोटी रुपये मिळतात. भारतात अनेक लेखक पोटासाठी, नोकरी कारकुनी करतात. जे लिहिल्यावर पैसे मिळतील असे सवंग लिखाण पोटासाठी करतात.

राजाकडे कलावंताना पूर्वी राजाश्रय असे. बिरबलाच्या दरबारात, विविध कलाकार, नवरत्ने होती. आज कलाकाराना आश्रयच उरला नाही.

प्यासा लेखक अजूनही प्यासाच आहे.

२४. आईच्या अश्रूंचा आवाज

अश्रुंचे पदण्याचा आवाज येत नाही. आईच्या अश्रुंकडे लक्ष द्यायला, हल्ली कुणाकडेच वेळ नसतो. मराठी घरांमध्ये, तसे प्रत्येकच घरी, आईला गृहीत धरले जाते. हरफण मौला, हरकाम्या गाडी, बावळट बाई, अशी किंमत आईची केली जाते. राग आला तर आपल्या संतापाला वाट देण्यासाठी आपण आई वरच गरजतो. ती बिचारी मूकपणे ऐकून घेते. एकतर्फी प्रेमाचे, सुंदर रूप म्हणजे आईचे मुलावरचे प्रेम! आपण आईला ते प्रेम, तसेच त्याच प्रमाणात परत करू शकत नाही, पण आई तसेच प्रेम करत राहते. अगदी मुल वाईट वागले तरीही ती शिव्याशाप देत नाही. कारण मुलाला दुःख देवून, ते दुःख पर्यायाने तिलाच होणार असते. आपल्या अपत्याला ती क्षमा करते. आई ही क्षमाशील असते.

कधी पटकन काही बोलून, आपण आईला दुखावतो, पण ती मोठ्या मनाने आपल्याला माफ करते. "आई मूर्ख आहे" असे बोलण्याची संधी आपण सोडत नाही. ती दुर्लक्ष करते. किती वेळा, आपण अगदी चार चौघात सुद्धा, अविचाराने तिचा अपमान करतो. तिला खऱ्या प्रेमाने विरक्ती येत असेल का? आईपणा शिवय अन्य ध्येय, नसल्याने नैराश्य येते का? आईचे वय वाढते, मूड स्विंगने कंटाळाच वाढतो. चिडचिड ही होते, शक्तिचि उणीव असते. तरीही तीचे जवळ सर्व काही देवूनही सर्व काही उरते, आईत अर्पणाने सुद्धा अपुर्णतः उरते. अपूर्णतेची जाणीव कमी व्हावी, म्हणून माणूस लग्न करतो ते टिकवतो. आई होणे हे त्याचे कारण असावे

अपूर्णता कमी होण्यासाठी, आपण लेकर खूप खरेदी करतो. लहान घरी अडगळ जमवतो. पण आईने सामान वाढवू नको, सांगितले कि रुसून बसतो. तिला खुपते, पण तिला ते विसारावेच लागते. तिला पुढे जाणायची घाई नसते, आपल्याला आपले गाव नकोसे वाटते. आपला देश, अडाणी वाटतो, पण ती संयम ठेवते. आपल्या देशात बेकारी आहे. भूक आहे, गरिबी आहे म्हणून, "मी परदेशी जाणार" असे सांगणाऱ्या शामला, ही शामची आई, समजवायचा प्रयत्न करून हरते. परक्या देशात, हे मुल कसे रुजेल, याची काळजी आईला असते. आपण सामान्य आहोत, हे आईने स्वीकारलेले असते, मुल ते स्वीकारत नाही. कठोर जगाचा अनुभव आईला असतो

आई खरेतर शाळेत, मुलाला सोडते, तेव्हाच ते मुल आई पासून वेगळे झालेले असते. सुखाचे मुखवटे चढवून "पाहुण्यांसमोर जरा बरे वाग" असे आई सांगते पण, अपरिपक्व मुलाला ते पटत नाही. कुठेतरी ही माणसे मुलालाच उपयोगी पडवीत म्हणून आई त्यांना धरून राहा, असे सुचवत असते. दुपारी जरा पडलेल्या, आईला "उठ, उठ पाणी दे" म्हणून उठवणारी मुले, नंतर शरीराला व्यायाम हवा, म्हणून मशीनवर ट्रेड मिलवर तासभर चालतात. जर बाजू बदलली, विचार केला, आईला समजून घेण्याचा जाणायचा, प्रयत्न केला, तर आई इतकेच सुख मुलांना मिळेल. निदान त्यांचा अपराधी भाव, पुढे येणार असेल तर, तो दुखी भाव कमी होईल.

जीवनात भेटणारी नाती अनेक असतात. मात्र गरजा वेगळया, हेतू वेगळे, कुठल्याही हेतू शिवाय, प्रेम करणारी व्यक्ती म्हणजे आई! आज वेळीच म्हणजे वेळ निघून जाण्यापूर्वी, आईला जाणले, तर नॉस्टेल्जीयाचा, स्मरण रंजणाचा, विकार सोसावा लागणार नाही. अवेळिला अर्ध्या रात्री हाक मारली, तर येणारी ही "आई" आपल्याजवळ आज आहे, कदाचित उद्या नसेल, पण आज आहे, तेव्हा तरी मी, तिच्यासाठी काय करतो? आज पैसा, पैसा वेळ नाही म्हणणारी मुले थोडी प्रगल्भ झाल्यावर, आईच्या आठवणीत, डोळयांच्या कडा पुसून, डोऴे ओलावताना दिसतात. सर्वांच्या दृष्टीने हृदय स्पर्शी असा

"आई" हा एकमेव शब्द आहे. मुलांची जबाबदारी, आई जेवढी उचलते, तेवढी कोणीही उचलत नाही. पुरुषाचे एका पैशाच्या, एवढे योगदानाने, घडलेले, आईचे रक्ताने वाढलेले, संपूर्ण मुल, आईचेच कर्तृत्व असते. मातृभाषा, मातृभूमी व माता या सर्वकाळ आदरणीय व श्रेष्ठच असतात. फक्त वेळीच समजणे व समजावणे आवश्यक आहे.

नाहीतर आपल्या वृद्धापकाळी, अपरात्री जाग आल्यावर फार वर्षांपूर्वी सोडून गेलेल्या आईच्या अश्रूंचा आवाज ऐकत रात्र ऊदासपणे अंगावर कोसळत राहते. आज जे कोणी भाग्यवान आहेत कि त्यांची "आई " त्यांच्या जवळ आहे, त्यांनी निदान आईला नमस्कार करून तिचा आशीर्वाद तरी घ्यावा.

# २५. विकास

विकासदराचे गणनेत, भारतात दारिद्र्य रेषेखालील, लोकांचा समावेश आहे का? गरीब, मागासलेले, त्यांचा विकास झाला? भारता सारख्या विकसनशील देशात, विकासदर ८. ५ होता म्हणे! जन सामान्यांचा विकास, म्हणजे काही मानवीय दृष्टीकोनातून विचार केला तर, सर्वांना जगण्याचा अधिकार मिळणे, संपत्ती अधिकार, पॉवरबाजी त्यांच्यापेक्षा जीवन महत्वाचे आहे. मानवी जीवनात, आवश्यक गरजा व सजीवांचा स्तर, सुयोग्य राहणे हे खूपच महत्वाचे आहे. वसुंधरा भकास करणे, नैसर्गिक स्त्रोतांवर हल्ला करणे, नद्या बुजवून घरे बांधणेम्हणजे विकास नव्हे. खरेतर गरिबांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष आहे का? गरिबांसाठी असलेल्या योजना यशस्वी होतात का? त्यांची कागदोपत्री आकडेवारी व गरीबांचा प्रत्यक्ष जीवनदर, अपयशी मानवांच्या आत्महत्या होऊनही, उत्सवामध्ये रमणारे सरकार बघता, विकासाचा, नक्की कोणता अर्थ अपेक्षित ठेवते? राजा परदेशी, जनता ऊपाशी.

शेतकऱ्यांच्या आत्महत्येसाठी कारणे शोधली गेली, पण उपाय शोधले? शेतकरी आत्महत्या थांबल्या का? ‘पिपली लाइव्ह’ या चित्रपटात दाखवल्या प्रमाणे, अनेक शेतकरी शेवटी शेतमजूर म्हणून किंवा कामगार म्हणून काम करतात. हे दाहक सत्य आहे. ते खरे आहे का? असेल तर का? असल्यास ते विकासाच्या कोणत्या परिभाषेत मोडते? पैसे मिळवणे, विकास उत्कर्ष वगैरे पायऱ्या आहेत. नैसर्गिक अवकाळाने शेतकी व्यवसायावर वाईट परिणाम होत आहे. त्यात शेती करण्याचे, सुद्धा एकत्रीकरण होण्याचे प्रायोजित आहे ज्यामुळे शेतकरी शेतमजूर बनण्याचा धोका आहे. अर्थात त्यात उत्तम मार्गदर्शनामुळे, त्याच्या किमान गरजा भागविण्या इतके उत्पन्न मिळण्याची खात्री देखील आहे. शेतकऱ्यांचे

प्रश्न जाणून घेण्यासाठी खास असा कुठलाही सर्व्हे केला जात नाही व त्यांच्या प्रश्नांवर उपाय सुद्धा योजले जात नाहीत. मूळ प्रश्नाला बगल देवून वरवरची मलमपट्टी केली जाते. वाटते निदान कॉनट्राक्ट फार्मिंग यशस्वी होऊ देत! वीज किती तास जावी? का जावी? दूरदर्शन रात्री अकरा ते सकाळी सात बंद ठेवावे, प्रसारणच थांबवावे. रेदिअो ऐकावा, म्हणजे लोड शेडींगचा धोका बऱ्याच प्रमाणात कमी होईल. मनोरंजनाचे पोरखेळ म्हणजे विकास नव्हे. चित्रपटांची अफूची गोळी म्हणजे २४ *७ लाइव्ह किंवा आजतक प्रगती नव्हे. या देशाला आय-टी सेक्टर किंवा चित्रपट सृष्टी, क्रिकेट, यापेक्षा अन्न धान्य, वीज, निवारा, पाणी, हवा यांचीही गरज अधिक महत्वाची आहे.

अनेक तरुण बेकार असलेल्या या देशात, लोकसंख्या नियंत्रणात आणण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात? जातात का? विकासाच्या दरापेक्षा लोकसंख्या वाढीचा दर जास्ती आहे. लोकसंख्या नियंत्रणात आणून शेती क्षेत्र सुधारण्या शिवाय, विकास अशक्यच दिसतो आहे.

महागाईचा दर ११% कमी झाला, तो कोणत्या उपायांनी झाला? ते उपाय अधिक कडकपणे का योजले जात नाहीत? हा दर तरी खरोखर कमी झाला आहे की statistic ची जगलरी, आकड्यांचा खेळ आहे. दर मार्च मध्ये थोडेसे पुढे-मागे करून, तेच ते बजेट, तोच तो अर्थसंकल्प व विकासाचे खोटे गाजर, जनतेला दाखवले जाते. प्रदूषण नियंत्रण व पर्यावरण रक्षणाचे पोकळ ढोल बडवले जातात. खरे तर वाढती महागाई होण्याचे कारण, लोकसंख्या वाढीच्या प्रमाणात शेतीचे उत्पादन वाढत नाही. पण त्या दिशेने प्रयत्न होत नाही.

कृषी उत्पन्नाच्या योजनेत खरा विकास हवा. छोट्या शेतकऱ्यांना बाजारपेठेत माल उठाव न होण्याची, भाव न मिळण्याची भीती नको. श्रमाच्या प्रमाणात, पैसे मिळत नाहीत. खराब होणारा किंवा नाशीवंत माल साठवण्यासाठी सरकारची स्वस्त गोदामे हवीत व अशी धान्ये साठवण्याच्या प्रक्रियेमध्ये अधिक संशोधन हवे. शेतकरी शेतीमध्ये प्रवीण असतो. मात्र बाजारभाव, त्याचे चढ उतार, आर्थिक साठेमारी यात हुशार असतोच असे

नाही. वीजपुरवठा, पशुपालन, दुग्ध व्यवसायाची जोड, खत, पाणी, बी बियाणे, मार्गदर्शन, समुपदेशन आर्थिक मदत, बाजारातील उठाव, रास्त बाजारभाव, अशा सर्व अंगानी शेतीमालाला दर मिळण्यासाठी व शेतीचा विकास होण्यासाठी, योग्य योजना व मदत आवश्यक आहे.

भारत हा कृषिप्रधान देश आहे. त्याला कृषी लहान होऊ देता कामा नये. विकासाचा दर ठरवताना, कृषी विभागातील प्रगती व दारिद्र्य रेषेखालील जनसमुदायाचा विकास, लक्षात घेणे आवश्यक आहे. अन्यथा अनेक अर्थ संकल्पाप्रमाणे "नेमिची येतो मग पावसाला" असा अजून एक अर्थ संकल्प येईल. तो अर्थ विषयक संकल्प असतो. तो अर्थ विकासाच्या सिद्धी पाशी जाणे आवश्यक आहे.

असे कधी घडेल? तो पर्यंत विकासाचे मृगजळ बघायचे व सवलती च्या गाजरा मागे धावायचे चालू राहील का?

# २६. कट्ट्या वरची मैत्री

आठवड्यात ऐकदाच जमणाऱ्या, कट्ट्यावर जमणाऱ्या आम्ही सर्व मैत्रिणी /मित्र एकमेकाशी जुजबीच ओळख धारण करतो. थोड्या वेळ भेटायचे, आलेला काय बोलतो ते ऐकायचे व थोड्या वेळाने आपापल्या घरी जायचे. कट्ट्यावर नाही आले तरी कुणाची बळजबरी नाही, आलात तरी ठीक नाहीतरी ठीक! नात्यात असतात तशा अपेक्षा नाही, वाटले तर या, नाही तर राहा! त्या त्या कट्ट्याचे ध्येय असेल, तशा भेटी व किरकोळ चर्चा. बाकी बंधनात्मक अशी भावनिक गुंतवणूक नसते. आपले नातेवाईक व त्यांच्याशी झालेले, वाद विवाद आपल्याला बरेच काही शिकवून गेलेले असतात. त्यामुळे आता वर-वरचे, काही अंतरावरचे व प्रोफेशनल, औपचारिक नाते कट्ट्यावर जपले जाते. त्यामुळे त्यात वाढ नाही, घट नाही. वैर नाही भांडणे नाही. जे बोलायचे असते ते मनातच ठेवावे लागते. पण मित्र नक्की कशाला म्हणतात? friend in need is 'not' my friend या नव विचारसरणीवर मध्यम वर्ग आलाच आहे ना! त्यामुळे कटुता नसलेले ग्रुप्स बनवण्याकडे, सामान्यांचा कल असतो. कॉलेज कट्टा असो, नाहीतर वरिष्ठ नागरिक कट्टा असतो. नैराश्य, गैरसमज, भांडणे, हळवेपणाचा त्रास, हे त्रासदायक मानसिक शत्रू असतात. त्या विषयावर, कट्ट्यावरील मैत्रिणींशी बोलले जात नाहीत. पूर्वग्रह दुषित भावनेतून, पूर्वी ठेच खाल्ल्याने, आता मैत्री न करण्याकडे कल असतो. वारंवारचे आजार, खूप रडावेसे वाटणे, वारंवार, त्या भूतकाळाच्या आठवणी काढणे, आयुष्य हातातून सुटून गेल्याची खंत बोचत राहते. आपल्या दुःखामुळे अजून दुःख नको, म्हणून आपण कोषात जातो व केवळ औपचारिक नात्यांकडे वळतो. कट्ट्यावरिल, समान छंद, माफक करमणूक, वरवरची चर्चा असे या कट्ट्यांचे स्वरूप असते. भावनेची गुंतागुंत नसते. काही वेळा, सामाजिक बांधिलकी पाळून, समाजकार्य केले जाते.

किंबहुना काही कट्ट्यांचे तेच ध्येय असते. मात्र मानवाचे मनात बदल होतो हे तत्व कट्ट्यावर स्वीकारले जाते. काऴ बदलला, जसा परदेशी प्रभावाने वेष बदलला.

आज कलकी नारीया, हैं मुफ्त कि बिमारीया

काम कुछ करती नही और बांधती हैं साडिया

वर्ष १९४९ पासून आज २०१६ पर्यंत, साडीपासून पॅंटटॉपपर्यंत आपण बदललो. कालानुरूप काही चांगले बदल घडतात तर काही चांगल्या गोष्टीही पडद्याआड जातात. बदलत्या काळाचे स्वागत तर करावेच लागते. ही गोष्ट ज्याला कळते तो हुशार पण ही गोष्ट ज्याच्या पचनी पडते तो खरा चतुर असतो. बाकीचे भूतकाळातील आठवणीवर, अश्रू ढाळतात व वर्तमान काळाच्या, प्रगतीलाही नाके मुरडतात, मात्र बदल अटल असतो, तो स्वीकारायला मानसिक मदत, हे कट्टे करतात. या कट्ट्यांचा फायदा म्हणजे रोजच्या त्याच त्या प्रश्नापासून दूर जाता येते. हे कट्टे एकटेपणावर फस्ट-एडचे काम करत. आठवड्यातून एकदा, त्या कट्ट्यावर जमण्याची, त्या वेळेची आपण वाट पाहतो. ते भाव, ते तयार होणे हे सुद्धा एक प्रकारे आनंददायी असते. टू लूक फोरवर्ड टू समथिंग! काही काऴ आनंदात खुशीत जातो. कट्ट्यांची लोकप्रियता, त्यांचे यश त्यातच आहे.

इंटरनेटवर सोशल नेटवर्किंग साईट आहेत. त्यांना ई-कट्टा म्हटले जाते. पिंपळ पारावर सुद्धा पूर्वी चावडी भरे व लोक शिळोप्याच्या गप्पा मारत असत. मात्र चावडी शब्दात एक कठोर शिस्त येते. जी प्रत्यक्ष भेटणाऱ्या कट्ट्यावरील लोकात नसते. मी-माझा मी-मी-मी किती श्रेष्ठ, मी अमुक मी तमुक असे विचार, गर्विष्ठ पणा या कट्ट्यांवर मुळीच आढळून येत नाही असे नाही पन कमी असतो. कट्ट्यावर वाटल्यास या, अन्यथा कारणे देवून टाळा, अशी सहज मानसिकता असते.

कट्ट्यावर कुणी येवो कुणी जावो, कट्टा चालूच राहतो. पिंपळ पारी वडाच्या झाडाखाली, कॉलेजच्या बाहेर, एखाद्या बागेत, रस्त्यात, चौकात, चहाच्या टपरीवर, असे कट्टे जागोजागी असतात. कॉलेज कट्टा, ही तर एक संस्कृती असते. मनात एक वसलेले

तरुणाईचे गाव असते. या कट्ट्यावर विद्यार्थी जे शिकतात, ते हजारो विश्व विद्यालयातही शिकता येत नसेल. समूहाचे मानसशास्त्र, कसे वागावे, कसे वागू नये, काय बोलावे, काय बोलू नये, भंकस किती करावी, रबर किती ताणावे, अभ्यास कसा करावा, कधी टाळावा, हे या कोलेज कट्ट्यावरच शिकता येते. केलेलि पहिली कविता कट्टाचऐकतो.

सुखाचा सदरा ही गोष्ट आपण नेहमीच ऐकतो. व. पु. काळे या कथेत म्हणतात त्याप्रमाणे प्रत्येकाच्या पाठीवर एक क्रॉस दिलेला असतो. व इच्छा असो नसो तो वहावा लागतोच. त्याच वेळी, देवाने, पायात एक साप सोडलेला असतो. तो साप सर्व आताच्या सुखावर भीतीचे सावट पाडतो. त्यातून सुटण्यासाठी हे कट्टे माणसाला मदत करतात. कधी कधी आनंदांत सुद्धा वाटेकरी हवे असतील तर कट्ट्यावर निखळ मनाने अभिनंदन करणारे असतात. कट्ट्यावरील मदलीत सहसा फारसे हेवेदावे नसतात.

कट्टा हे क्षणभर विश्रांतीचे स्थान तर आहेच वर सांस्कृतिक चळवळीचे स्थान आहे.

तुम्ही कोणत्या कट्ट्यावर जाता, यावर तुमची ओळख होते, ठरते, म्हणजे कट्ट्याचे आयडेन्टीटी कार्ड पुढील मैत्रीत उपयोगी पडते.

# २७ तू कधी सांजवेळी

कधी सांजवेळी मला आठवूनी
तुझ्या भोवताली, जरासा वळूनी पाहशील का?

तू जरी दूर, येथे उठू डे शहारा
शरीरावरुनी जसा गार वारा, वाहशील का?

रिते सूर आता इथे या उराशी
जरा सोबतीला मनाच्या तळाशी, राहशील का?

तुझ्या आठवांना इथे साहतो मी
तुला साहतो मी, तशी तू मलाही साहशील का?

कवि सौमित्र.

सांजवेळी, त्या राजवाड्याच्या दारात, मी उभी होते. कुणा उस्मान आली खान कि असेच काहीसे, नाव असलेल्या, निजामाची ती कोठी होती. पूर्वी तिथे दरबार भरे. ह्या दरवाज्याचे मुख्यद्वार नेहमी पडद्याने झाकलेले असे, पाहुणा आला कि तो पडदा वर

करण्यात येई. व त्यापाहुण्याला आत घेतले जाई व पुन्हा पडदा पडे. तो मुगल सरदाराचा महाल होता कि मराठा सरदाराची हवेली कि राजवाडा होता हे आता सांगणे कठीण आहे. त्या त्या, काळाच्या, त्या त्या वेळे नुसार त्या वास्तूचे रूप होते. काही वर्षापूर्वी त्या काळी, दोन घट्ट वेण्या बांधलेली, फुग्यांच्या बाह्यांचे, परकर पोलके घातलेली मी त्या अंगणात वावरले होते. काल परकराला, ओढनीला रंगीत रेशमी गोंडे होते, मण्यांचे भरतकाम होते. त्या महालाच्या वेगवेगळया रंगीत आरशात माझे ते अल्लड बालरूप अनेक प्रतिमांत दिसे. त्या भव्य महालाचा, अवशेष, भग्न महाल आता मागे उरला आहे. एकेकाळी पूर्ण समृद्ध वास्तूचे आता अवशेष उरले आहेत. त्या अंगणातील कोपऱ्यात माझे बालपण कधी बागडत, कधी हुंदके देवून रडत, तारुण्य पावसात भिजत, गात पडले आहे. आई वडिलांच्या, अकाली मृत्युनंतर, ती समृद्धी आता माझी उरली नाही. समृद्ध हवेली आठवणीत उरली आहे. त्या हवेलीला, वाडयाला जीव असता तर? सर्व सात जन्मांत, मागे वळून पाहता आले तर?

'कधी सांजवेळी, तू मला आठव, ' असे सुचवणारी ही कविता, फक्त प्रियकर प्रेयसीचे नाते अधोरेखित न करता, कुठल्यातरी वेगळयाच हरवलेल्या नात्यांबद्दल सांगते, असे मला वाटते. ही अनाम व्यक्ती, जिचा उल्लेख या कवितेत आहे ही माहेरची वास्तू असू शकते किंवा बालपणीची शाळा असू शकते. आपापल्या मनातील, त्या गाढ, गूढ हळव्या नात्याबद्दलची ही कविता, "सांजगारवा" अल्बम मध्ये आहे. तुम्हाला ऐकल्याची आठवते का? हा शब्दमहाल ओळखीचा वाटतो का? नाही?

एखाद्या सांजवेळी एकटे बसून बघा.

# २८ रानफुलांचे नाते

चकचकीत अशा कफ परेडच्या ऑफिस कार्यकालानंतर, माझी त्या ऊसगावी खेड्यात बदली झाली, तेव्हा मला नैराश्य यायचे बाकी होते. घाणीचे साम्राज्य, अनधिकृत बांधकामे, कच्चा रस्ता, गरिबी, विकसनशीलता, विचित्र काही- पार मनाचा चोळामोळा झाला होता.

आपण कायम स्वच्छता व सौदर्य यांची आपले मनाला सवय लावलेली असते. हिरवेगार गालिचे, खंडाळयाचा घाट, हिमालयाची शिखरे, हसरे बाळ, अश्या सर्वप्रकारच्या शुभ कल्पना मनासमोर आणूनही, वास्तवाची झळ संपत नसे. चिंचोळे रस्ते. तिथे भरधाव वाहत, धूळ उडवणारी वाहने, जवळच्या पुस्तकात डोके घालून, मी मन रमवायचा प्रयत्न केला. पण पुस्तके ही मित्र असतात हे सर्व वेळी खरे ठरतेच असे नाही. डास चावायला लागले, पाणी अशूद्ध प्यावे लागले कि प्रगतीचा दर, विकास आयटी क्षेत्र ह्या कल्पना खोट्या वाटू लागतात.

घरी सर्वांना वाटे, मी नव्या जबाबदारीने कंटाळले असावे. अशाच एक दिवशी, दीड तास ट्राफिक मध्ये गाडी अडकली. चुळबुळ करून कंटाळा आला. मी खिडकीची काच खाली करून, नीट निरखून पहिले, बाजूच्या मातीच्या ढिगाऱ्या वरपिवळी रानफुले उमलली होती. त्या फुलांच्या बाजूला ठिपक्या एवढे, एकच पान होते. प्रश्न चिन्हा सारखे! मला त्या फुलांचा पसारा पाहून, पुन्हापुन्हा त्या प्रश्न चिन्हांच्यासारखे दिसणाऱ्या फूल सड्याचे नवल वाटले.

प्रत्येक फुलाला हक्क आहे

दिमाखाने जगण्याचा

आहे त्यात आनंद मानण्याचा.

इतक्या घाणीत, रबड मातीच्या ढिगाऱ्या वर निरपेक्षपणे ही फुले उमलू शकतात? देवाच्या मनात, त्यांना तिथे जन्म देण्यात, काहीतरी हेतू असेलच की! कदाचित मला सुद्धा या गावी, बदली देण्यात, देवाचा असा बदलता हेतू असेल. उत्तम सजवलेल्या फ्लॉवर पॉट मधील फुलांप्रमाणे गुच्छा प्रमाणे, बागांमधील रंगीत वाफ्या प्रमाणे, रानफुले देखील, घाणीत सुद्धा सुंदर असतात. आनंद हा कुठेही उमलतो, त्यासाठी सर्व काही सुरचित असणे आवश्यक असते असे नाही. असेल तर ठीकच असते. पण नसेल तरीही ते जीवन थांबत नसते. सौंदर्य सुख, आनंद, कुठेही असतो, बघता यावा, मानून घ्यावा. रानफुलांनी, मला जीवनाचे नाते सांगितले. त्या दिवसा पासून माझे त्या रानफुलांचे नाते घट्ट मैत्रीचे झाले आहे.

मी माझ्या कविता संग्रहाचे नाव सुद्धा "रान फुलांचे थवे" असे ठेवायचे ठरवले आहे.

# २९ सास भी बहु भी!

दूरदर्शन वरील मालिकांतील बायकांबद्दल काहीतरी लिहा, असे मला एका संपादकांनी सुचवले. खरे सांगू, त्या टीव्हीचे व माझे कधीच जमले नाही. काम नसणाऱ्यांचे, डोके पार कामातून घालवणाऱ्या, त्या टीव्हीचे व्यसन, दारूहून फार मोठे आहे. टीव्ही बघण्याच्या सवयीवरून काही प्रश्न मला नेहमी पडतात-

१. रडण्याचा प्रमाणात मालिकेत पगार देतात का?

२. नायिकांना रडायचा कंटाळा येत नाही का?

३. अशा मालिका दाखवणारे का दाखवतात? बघणारे का बघतात?

४. लाल जर्द लिपस्टिक सुहागन, गुलाबी लिपस्टिक अभागन अशी विभागणी आहे का?

५. मोठे मंगळसूत्र व ५ ग्रॅम सिंदूर, यामुळेच यावरच सौभाग्य ठरते का?

६. स्त्रियांचे प्रश्न, पुरुषांभोवातीच फिरतात का?

७. दूरदर्शन वरील बायका, झोपताना उठताना सुद्धा जरीच्या साड्या व दागिने घालतात कि काय?

८. प्रत्यक्ष जीवनातील सासूशी त्या कशा वागतात?

९. बांगड्या घालणे, आउट ऑफ फ्याशन नाही का?

१०. एके दिवशी रडायला किती बाटल्या ग्लिसरीन लागते?

११. असे सजून धजून स्वयपाक करता येतो का?

१२. हातात पुजेची थाळी घेऊन देवऴात आलेले, कुणीही माणूस, मी आज पर्यंत रस्त्यावर बघितले नाही, यांना थाऴी घेवून जायला रिकामा रस्ता कसा सापडतो.

१३. नवऱ्याला परस्त्री पासून वाचवण्याचा, त्या बायकांचा आटापिटा कुठे कुठे चालतो? त्यांच्या घरी मोलकरणी दांड्या मारतात का?

१४. वीस माणसांचा स्वयंपाक, मेकअप खराब न होता कसा केला जातो?

१५. कधी ही बघा, लग्नाला निघाल्या सारख्या जरीच्या बनारसी साड्या का घालतात? प्रामाणिक नोकर त्यांना कुठे मिळतात?

१६. चांगले कपडे घालणे ठीक, पण काठाची जर त्यांना टोचत नाही का?

१७. मेकअप खराब होत नाही का? मेकपने गरम होत नाही का?

१८. नाकातल्या नथनी, कानातले जड कानातले सहन कसे होतात?

१९. डोक्यावर पदर घेणारी बहु, मी १%च पाहिली आहे. मग ह्या बहूंची कथा, कहाणी घर घर कि कशी होऊ शकते.

२०. चोर रस्त्यात, लोकलमध्ये, कार मधून जाताना सिग्नल जवळ दागिने चोरतात, मग या बायकांचे दागिने कधीच चोरीला का जात नाहीत?

२१. नेहमी करोडोंची भाषा करणाऱ्यांना, करोड मध्ये किती शुन्य येतात, हे माहित आहे का?

२२. घरात चार इंच उंच टाचेच्या स्यांडल्स? तोंडावर पडले म्हणजे? असू दे, त्यांच्या मालिका त्यांनाच लखलाभ होवोत।

मी टीव्ही वरच्या बायकांबाबत, एवढे प्रश्नच लिहू शकते? माझे करीयरची चांगली संधी वाया गेली, याच कारणाने हो.

# ३०जिभेचे हाड

वाटेल ते बोलणाऱ्या व्यक्ती बद्दल बोलताना, "त्याच्या जिभेला हाड नाही" असे म्हटले जाते. ज्याने वाईट बोललेली गोष्ट खरी होते त्या व्यक्तीला "त्यची जीभ काळी आहे " म्हणतात.

Always control those things

Tongue, Temper, Thoughts

हिंदी सिनेमात "जबान को लगाम दो" म्हणत जिभेवर आवर घालायला सांगितले जाते. जीभेच्या वळणावर, बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. सापाची जीभ, ही दोन भागात कापलेली असते. त्यामुळे तो दुतोंड्या, द्वयर्थी व्यक्तिमत्वाचा असतो असे मानले जाते. मानवाचे मात्र, एक शब्दी एक वचनी असणे देवाला अपेक्षित असावे. म्हशींची जीभ, ही अशीच सर्वाधिक मऊ मानली जाते. जीभेचे घसरणे मानवाला खूप घातक ठरते. एखादा उणा शब्द हा त्या व्यक्तीच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरतो. जिभेतुन बाहेर पडणारे शब्द, हे बाणाप्रमाणे असतात. ते जिथून निघतात, तिथे काहीच खुण उरत नाही पण जिथे ते बाण आदळतात, तिथे कायमची जखम होते.

शरीराच्या जखमा भरून निघतात, पण वाग्बाणाने झालेल्या जखमा भरून येत नाही. भात्यातून सुटलेला बाण जसा परत येत नाही, तसा जिभेतुन सुटलेला शब्द सुद्धा परत बोलावता येत नाही.

रामायण -महाभारतात सुद्धा जीभेच्या त्या फाजील वळवळीने, केलेला घात सांगितलेला आहे. द्रौपदीने कर्णाला नकार देताना, सूतपुत्र म्हणून हिणवले होते, जे कर्ण

कधीच विसरू शकला नाही. मायावी महालात, पाण्यावरील रांगोळीवर चालताना दुर्योधन पाण्यात पडल्यावर, द्रौपदी सख्यांजवळ मोठ्याने हसत म्हणाली, "आंधळयांचे पुत्र आंधळे असतात. " तिच्या ह्या जीभेच्या वळवळण्याने, तिचा घात झाला. अर्थात रागाचा परिणाम, जिभेवर पटकन होतो व जिभेचा प्रहार तलवारी सारखा लागतो. दुः खाला रागाला, विवेक नसतो. माणसाचा त्या वेळी मग जिभेवरचा ताबा सुटतो. मेंदूची व जिभेची लिंक तुटली कि ती जीभ सैरावैरा धावत सुटते. सैराट होते. अहंकार डोक्यात शिरला कि तसेच अधिक शक्य होते.

जिभेला हाड नाही हे मान्य आहे पण तरीही शिस्त लावली तर जीभ योग्य कवायत करू शकते. अर्थात ते अवघडच! अन्यथा जीभ घसरतेच. ३२ दात तोडण्याचे काम जीभ करु शकते. गमतीशीर जीभाळेtongue twisters "पितल के पतिले पे पपीता, लाल लॉरी लाल लॉरी हरी लॉरी लॉरी"ऊच्चारताना असे गमतीशीर जीभाळे पुढे कसेसेच होतात व जिभेचे महत्व कळते.

साधारण जीभ व पैसा या दोनच, अस्थिर गोष्टी, मानवाच्या दुःखाला कारणीभूत ठरतात. जीभेच्या चोचल्यानी माणूस खूप खातो, आजारी पाडतो, वाटेल ते बोलतो. मौनाचे महत्व आपल्या मुनिजनानी सांगितले आहे. "मौनं सर्वार्थ साधनम" मुलाखत देताना चतुर महाशय म्हणतात- "नो कॉमेंटस "

words are silver, silence is gold

डॉक्टर लोक जिभेवरुन, माणसाच्या आरोग्याचे निदान करतात. तर माणसाच्या बोलण्याच्या पद्धती वरून त्याचे ते व्यक्तिमत्व समजते. जीभ बाहेर काढून, दाखवून ठेंगा दाखवून, लहान मुले पळतात. वात्रट मुलांचा तो चाळा असतो. घोड्यांना लगाम लावणे सोपे असते पण जिभेला लगाम लावणे, अवघड असते. मार्कंडेय पुराणातील, काली मातेची मूर्ती तिची लालभडक जीभ बाहेर काढून, अक्राळ विक्राळ रूप धारण केलेली आहे. त्यात तिचा राग व्यक्त होतो. कुत्रा मालक येताच, जीभ बाहेर काढून हलवून आनंद व्यक्त करतो.

जीभेच्या गोड बोलण्याने, अनेक कामे साधतात. गोड गोड बोलून गळा कापणाऱ्याना जिभेचे हत्यार पुरेसे होते. बोलून जीभ मोकळी होते, पण त्रास मालकाला होतो या उलट 'पिंजरा' चित्रपटातील शेवटचे दृश्य आठवा. "मास्तर समजावून सांगतात, तू बोलू नकोस, पण नर्तिका संध्या ऐकत नाही, मात्र कोर्टात ऐनवेळी संध्याची जीभ चिकटून जाते व ती जे बोलायचे ते बोलूच शकत नाही. खूप दुःखद प्रसंगात माणसाची वाचा जाते. (उदा. कहो ना प्यार हैं मधील चिंटू) अनेक ऋषी मुनिंना वाचा सिद्धी असते, ते बोलतील, देतील तो आशीर्वाद खरा होतो. मला पण असाच शुभ आशीर्वाद मिळाला जीभे बद्दल लिही. ता यश मिळेल. जीभा चावू नका! खरे आहे ना!

# शुभांगी पासेबंद



जर्नालिझम मध्ये गोल्डमेडल मिळवणाऱ्या आणि लोककला अकॅडमीमधून डिप्लोमा मिळवणाऱ्या शुभांगी पासेबंद (MSc. B. Ed.) एका बड्या बॅंकेचं मॅनेजरपद सोडून आता पूर्णवेळ लेखनात उतरल्या आहेत. ई साहित्यच्या वाचकांना त्यांच्या कादंबऱ्या माहित आहेतच. त्यांच्या कस्तुरीपक्षी, राहू दे घरटे आणि तुझेच मी गीत गात आहे या तिन्ही कादंबऱ्यांना वाचकांनी भरभरून प्रतिसाद दिला. या तिन्ही कादंबऱ्यांतून स्त्रीची विविध रूपे आणि स्त्रीजीवनातला संघर्ष यांची प्रचिती वाचकांपर्यंत नेण्यात त्या यशस्वी ठरल्या.

छापील प्रकाशनांमध्येही शुभांगीजींचे नाव गाजत असते. लोकसत्ता, पुढारी, प्रहार, गांवकरी अशा अनेक वृत्तपत्रांतून त्या स्तंभलेखन करत असतात. आजवर त्यांचे जवळपास चारशे ललित लेख प्रसिद्ध झाले आहेत. याशिवाय स्त्री, ललना, मेनका, गृहलक्ष्मी, प्रतिभा अशा अनेक नियतकालिकांतून त्यांचे लेखन प्रसिद्ध झाले आहे. आजवर त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले असून त्यात सावित्रीबाई फ़ुले पुरस्कार, महाराष्ट्र दीप पुरस्कार, प्रफ़ुल्ल दत्ता "कुशल संपादक" पुरस्कार व उत्कृष्ट समाजसेविका पुरस्कारांचा समावेश आहे. शुभांगीजींच्या " क्या इतनी बुरी हूं मैं मां" हा स्त्री भ्रूणहत्याविरोधी एकपात्री प्रयोग आणि " नाते शब्दांचे" हा कार्यक्रमाचेही अनेक प्रयोग होत असतात.

ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े शुभांगीजींना पुढील लेखनासाठी अनेकानेक शुभेच्छा.

# शुभांगी पासेबंद यांचे प्रकाशित साहित्य

1 मयूरमासा कादंबरी - 2012 हार्ड कोपी--महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ-नवोदित अनुदान योजना

2. नाते शब्दांचे ललित - 2014 हार्ड कोपी---पुणे----बुकगंगा डॉट कॉम

3. मुलीही जन्माला येऊ द्या-ललित-2015 हार्ड कोपी----पुणे-बुकगंगा डॉट कॉम

4. रंगकेशरी - कादंबरी- इ-बुक - 2015-------बुकगंगा डॉट कॉम

5. बिलिव्ह इट ऑर नॉट कथासंग्रह - इ-बुक - 2016---बुकगंगा डॉट कॉम---विनामूल्य

6. कस्तुरी पक्षी- इ बुक- कादंबरी- ई साहित्य - 2016------------विनामूल्य

7. एक दिवा लावूया - स्तंभ संग्रह - 2016 बुकगंगा डोट कोम-----

8. जाईन मी विचारीत- स्तंभ संग्रह - 2016----बुकगंगा डोट कोम

9. राहू दे घरटे- ई साहित्य - कादंबरी-2016--विनामूल्य

10. मी तुझेच गीत गात आहे-ई साहित्य - कादंबरी-2016--विनामूल्य

11. मधुर दंश कथासंग्रह - 2016हार्ड कोपी---पुणे

12. आम्रकुसुमांजली - स्तंभ संग्रह--ई साहित्य---विनामूल्य

१३ कृष्णकुसुमांजलि -स्तंभसंग्रह---ई साहित्य--विनामूल्य

१४ स्वर्णकुसुमांजली - स्तंभसंग्रह---ई साहित्य--विनामूल्य

१५. (आगामी)- कुठे शोधिसी रामेश्वर- पर्यटन विषयक लेख---नागपुर

सर्व पुस्तके ई बुक स्वरूपात उपलब्ध आहेत

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान मराठी साक्षरांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि लेखक व कवींना एक सशक्त व्यासपीठ मिळावे या दुहेरी हेतूने स्थापन झाले. मराठीत एक जबरदस्त वाचन संस्कृती निर्माण व्हावी, तरुणांनी भरपूर वाचन करावे, ग्रामीण भागातील तरुणांना मोबाईलवर पुस्तके उपलब्ध व्हावीत, परदेशस्थ मराठी वाचकांना सहजासहजी इंटरनेटवर पुस्तके मिळावीत हे आमचे स्वप्न. जगातील चाळीस देशांतील  सुमारे साडेतीन लाख वाचक या चळवळीचे सभासद आहेत. त्याशिवाय वर्षाला सुमारे तीस ते चाळीसलाख वाचक वेबसाईटवरून पुस्तके डाऊनलोड करतात.

अर्थात याने आमचं समाधान नाही. सुमारे बाराकोटी मराठी माण्सांपैकी किमान अर्धे म्हणजे सहा कोटी लोक “वाचक” व्हावेत अशी आमची इच्छा आहे. माउलिंनी सांगितलंय. “जो जे वांछिल ते तो लाहो”. आमचीही वांछा “तो” पूर्ण करील. करीलच.

आमच्या वाचकांना एकच विनंती. आपल्या ओळखीच्या किमान दहा साक्षरांचे ई मेल पत्ते आम्हाला पाठवा. अशा रितीने आपण तीनाचे तीस आणि तिसाचे तिनशे होऊ. या मराठीचिये नगरी ब्रह्मविद्येचा सुकाळू व्हायला वेळ नाही लागणार. सर्वांची साथ असेल तर.

एवढी विनंती मान्य कराच.

ई मेल पत्ते esahity@gmail.com या पत्त्यावर पाठवा बरं!